सोनाली सामंत

# पुर्वाभास



# पूर्वाभास

(लघुकादंबरी)

लेखिका

## सोनाली सामंत

ई साहित्य प्रतिष्ठान

# हे पुस्तक विनामूल्य आहे

# पण फ़ुकट नाही

हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

# पूर्वाभास


## लेखिका : सोनाली सामंत

फोन नं. ९७६२५४७५२०

E-mail: sonali.samant1@gmail.com



या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे . तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते .



प्रकाशक--- ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmaaail.com



©esahity Pratishthan®2018




प्रकाशन : ४ जानेवारी २०१८




विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध

- आपले वाचून झाल्यावर आपण फॉरवर्ड करू शकता
- हे पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापूर्वी किंवा वाचना व्यातिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी आवश्यक आहे.




<u>मनोगत</u>

'पुर्वाभास' ही माझी चौथी कादंबरी माझ्या लाडक्या वाचकांसाठी प्रकाशीत करायला मला अतीव आनंद होत आहे. नोकरी करता करता लिखाणाची आवड जपणे म्हणजे कधी कधी तारेवरची कसरत होते. तरीही वेळात वेळ काढून मी लिहित असते. पुढची कादंबरी कधी पाठवणार अशी विचारणा अजून लिहायला हवं याचं भान मला देते. यु.एस.ए. वरून जेव्हा वाचकाची प्रतिक्रिया आली तेव्हा आपलं लिखाण पर प्रांतात गेलं याच अप्रूप वाटलं. अगदी आठवणीने ई मेल्स करणारे माझे प्रिय वाचक हेच माझ्या लिखाणाचा आत्मा आहेत. तसेच हे साहित्य विनामुल्य वाचकांपर्यंत पोचवणारी प्रकाशन संस्था 'ई साहित्य प्रतिष्ठानचे' अनेक आभार.

या कथेमध्ये प्रेम, रहस्य यांचा मेळ साधायचा प्रयत्न केला आहे. 'प्लँचेट' या लघु कादंबरी नंतर प्रेमकथा लिहा अश्या प्रतिक्रिया आल्या त्याची जाणीव ही कथा लिहिताना ठेवण्याचा मी प्रयत्न केला आहे. थोडा वेगळा विषय आहे आशा करते तुम्हाला नक्की आवडेल. नेहमी प्रमाणे तुमच्या प्रतिक्रियांच्या प्रतीक्षेत!

लेखिका : सोनाली सामंत

फोन नं. ९७६२५४७५२०

E-mail: sonali.samant1@gmail.com

# ओळख



मी महावितरण मध्ये डेप्युटी मॅनेजर म्हणुन कार्यरत आहे. माझे जन्मस्थान व कर्मभुमी सिंधुदुर्ग. लेखन हा माझा छंद आहे. लिहायला बसल्यावर इतर सर्व विचार दूर जातात. ती एक नशा वाटते. वेगळ्याच जगात वावरत असल्यासारखं वाटतं. काल्पनिक पात्रं आपलीशी वाटतात. एखादा चित्रपट पाहत असल्यासारखी कथा समोर ठाकते.

सुहास शिरवळकर, नारायण धारप, शोभा राऊत, योगिनी जोगळेकर यांचे साहित्य वाचायला मला खुप आवडते. ही सर्वजण माझी प्रेरणास्थाने आहेत.

## संपर्क


फोन नं. ९७६२५४७५२०

E-mail: sonali.samant1@gmail.com

# अर्पणपत्रिका

निरपेक्ष भावनेने लोकांपर्यंत साहित्य पोचवणाऱ्या

‘ई साहित्य प्रतिष्ठान’

या प्रकाशन संस्थेस

हे पुस्तक समर्पित.

सोनाली सामंत

सिंधुदुर्ग

या कथेमधील सर्व पात्रं व घटना काल्पनिक आहेत

त्यांचा वास्तवाशी कोणताही संबंध नाही.

साम्य आढळल्यास तो निव्वळ योगायोग समजावा.

# पुर्वाभास



थरथरत्या हातानेच तिने जुनी डायरी उघडली. कित्येक वर्ष जणू ती डायरी उघडण्यासाठी आसुसलेली होती. त्या डायरीलाही एक सत्य पोटातून बाहेर येऊ द्यायचं होतं. त्यासाठीच देवाने पोटमाळ्यावरच्या उंदरांपासून तिचं रक्षण केलेलं असावं! देवाने कि कोणत्यातरी अनाहूत शक्तीने? समजलेलं सत्य पचवण्याइतकी ताकद तिच्यात नव्हती. हाताची थरथर आता वाढली होती, श्वास एवढा फुलला होता की त्यातच तिचा तोल गेला आणि ती खाली कोसळली. पडतानाची शेवटची आठवण म्हणजे तिच्या नावाचा झालेला आर्त पुकारा, ओवीSSSSSSSSSSS!

ओवी म्हणजे एक अबोल, लाजरी कळी होती. वयाच्या बाराव्या वर्षीच मात्या-पित्याचं छत्र हरवल्यामुळे आणि त्यानंतर मामा-मामीच सर्वस्व झाल्यामुळे तिच्या निरागस चेहऱ्यावर अकाली प्रौढत्व आले होते. ओवीचे मामा म्हणजे श्री अंकुश अभ्यंकर यांनी तिला रीतसर दत्तक घेऊन तिच्या आयुष्यामधली पोरकेपणाची पोकळी भरून काढायचा प्रयत्न केला होता. परंतु एकुलत्या एक असलेल्या ओवीला आजवर आई-वडिलांच्या प्रेमामध्ये वाटेकरी नव्हता. परिणामी त्या मधुर जुन्या आठवणी विसरणं तिला जमत नव्हतं.

आज बि. एम. एम. च्या शेवटच्या वर्षाचा शेवटचा पेपर होता. ओवीला लहानपणापासून पत्रकार व्हायचं होतं. नाकासमोर चालणाऱ्या ओवीचं कॉलेज आणि घर याव्यतिरिक्त दुसरीकडे कधीच पाऊल वळलं नाही, त्यामुळे मित्र मैत्रिणीही विशेष असे नव्हतेच. त्यातल्या त्यात राधिका पंडित बरोबर तिचं विशेष पटत असे. कारण राधिका तिची बालमैत्रीण होती. एकाच गल्लीत त्यांचं पोरसवदा वय गेलं होतं. मामांचं घरही तीन-चार किलोमीटरवर असल्याने त्यांच्यातली मैत्री अखंड राहिली होती. ओवीचा सहवास जास्त लाभावा म्हणून

राधीकानेही जरनॅलीजम करायचं ठरवलं होतं परिणामी दोघीही सख्या एकत्रच मोठ्या झाल्या. या मधल्या काळात त्यांच्यातली मैत्री अगदी गाढ झाली होती.

“एकदाची परीक्षा संपली बाई, आता रिझल्टपर्यंत आराम, ” आळस देत हात लांब करत राधिका म्हणाली. तसं ओवीला हसू आलं. इंजिनिअर, मेडिकल सारखा काही त्यांचा व्हास्ट कोर्स नव्हता. या तीन वर्षांत राधिकाने खुप धमाल केली होती. मुळात ओवीसारखा एककल्ली स्वभाव नसल्याने आणि छोट्या छोट्या गोष्टीत आनंद शोधायची वृत्ती असल्याने राधिकाचा परीक्षेचा कालावधीही आनंदात गेला होता.

“रिझल्टपर्यंत आराम म्हणते आहेस, ते आधी असे काय गं तीर मारलेस? दुपारी एकला कॉलेजमधून घरी पोहोचत होतीस त्यानंतर पाच पर्यंत ताणून द्यायचीस ना, ” कॉलेजच्या प्रशस्त प्रवेशद्वारातून बाहेर पडता पडता ओवीने विचारलं.

“पान तंबाखुच्या व्यसनापेक्षा झोपेचं  व्यसन चांगलच, ” स्कूटीवर बसून हेल्मेट घालता घालता राधिका म्हणाली तसा ओवीने तिला चिमटा काढला.

दोघीजणी राधिकाच्या घरी आल्या. आजचा संपूर्ण दिवस आणि रात्र तिकडेच राहायचं ओवीने ठरवलं. राधिकाची आई कोकणातली असल्याने ती उत्तम मासे बनवीत असे. घरामध्ये तळलेल्या माश्यांचा घमघमाट सुटला होता. ओवी कोकणस्थ असल्याने घरचे पक्के शाकाहारी होते. तर राधिका सारस्वत असल्याने तिच्या घरी सर्रास मासे असतं. मुंबईसारख्या समुद्र लाभलेल्या ठिकाणी सागरसंपत्तीची रेलचेल होती. अश्यावेळी आपल्या बालमैत्रीणीला त्याचा मोह न लागेल तर आश्चर्य!

“ओह काय मस्त वास येत आहे! आईSSSSSS आम्ही आलोय गं, वाढायला घे, ” राधिकाने घरात शिरताच फर्मान सोडले. दिवाणखान्यात कोणीतरी साधारण पंनाशीची व्यक्ती बसली होती. राधिकाने ओळख करून दिली,

“ओवी हे माझ्या बाबांचे मित्र आचार्य काका. यांची प्रकाशन संस्था आहे. मोठमोठे लेखक यांच्याकडे आपली पुस्तके प्रकाशनासाठी देतात, ” ओवीने नमस्कार केला.

“ओवी? छान नाव आहे. तुम्ही एकाच कॉलेजमध्ये वाटतं, ” आचार्य काका त्या दोघींना बसायची खुण करत म्हणाले.

“हो. आमची अगदी लहानपणापासून घनिष्ट मैत्री आहे. आज शेवटचा पेपर झाला त्यामुळे जरा मजा करायला भेटलो, ” राधिका आईने आणलेल्या पन्ह्याचे पेले टेबलवर मांडत म्हणाली. एवढ्या बड्या माणसासमोर ओवीला बुजल्यासारखं झालं. तरीही ती कान देऊन आचार्य काकांचं बोलणं ऐकत होती.

“लेखन हा एक छंद आहे. चार ओळी लिहायला मनात विषय तयार हवा. ते मग आपोआप सुचत जात. हातातली लेखणी झरझर चालायला लागते. जणू आपण त्या जगात गेलेले असतो. त्या काळापुरत लेखक स्वतःचं अस्तित्व विसरून जातो. कथेतली पात्रे आपलीशी वाटायला लागतात. काहीवेळा चित्रपट पाहत आपण लिहितोय असा भास होतो. ती एक अतिशय सुंदर अनुभूती आहे. ”

“काका कोणीही लिहू शकतं का? ” भारावलेल्या अवस्थेत ओवीने प्रथमच विचारले.

“हो नक्कीच. त्यात काहीच कठीण नाही. कित्येकदा आपल्यामधले सुप्त गुण आपल्याला अनोळखी असतात. आता तुला मोकळा वेळ आहेच. बघ, नक्की काहीतरी सुचेल, ” काका म्हणाले. राधिकाची आई जेवायला बोलवायला आली. खोबरेल तेलात तळलेले मासे, कोलंबी भात, कोशिंबीर, सोलकढी असा फक्कड बेत केला होता. मात्र आज ओवीचं  मन भरकटलं होतं. माश्याची फोड तोंडात घालताना तिला फार वर्षांपूर्वीचे दिवस आठवले. ओवीला लिखाणाची आवड होती. म्हणजे लहानपणी ती खुप कविता करत असे. परंतु मग कामाच्या जंजाळात वेळेअभावी आवड मागे राहिली. आता परत सुरुवात करायचं असं तिने ठरवलं आणि मन लावून ती जेऊ लागली.

रात्री बिछान्यावर पडल्यावर मात्र लिखाणाचा विचार पुनःश्च तिच्या डोक्यात शिरला. “कुठे तंद्री लागली आहे? मी कधीपासून तुला काहितरी विचारत आहे, ” ओवीला गदगदून हलवत राधिकाने विचारले.

“अगं मी आचार्य काकांच्या बोलण्याचा विचार करतेय. ”

“म्हणजे? मी समजले नाही. ”

“अगं लिखाण सुरु करावंसं वाटतं आहे, ” ओवी अंगावरचं  पांघरूण नीट करत म्हणाली. रात्रीचे बारा वाजून गेले होते. दोघींच्या गप्पा संपत नव्हत्या आणि अचानक ओवी अशी विचारमग्न झाली होती.

“अय्या मी तुला तेच सांगणार होते. पूर्वी तू छान कविता करत होतीस, मग तू ते सोडूनच दिलंस, ” राधिकाला त्यांच्या इयत्ता चौथी मधला प्रसंग आठवला. तेव्हा ओवीला काव्य स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळाला होता.

“आई-बाबा गेले आणि सगळी इच्छाच गेली. आज कित्येक वर्षांनी आचार्य काकांच्या रूपाने जुन्या आठवणी जाग्या झाल्या, ” ओवीचे डोळे पाणावले.

“मामा-मामी तुझ्यासाठी कित्ती करतात. तेवढं प्रेम ते सार्थकवर देखील करीत नसावेत, ” राधिका ओवीला समजावत म्हणाली. तशी तिनेही मान डोलावली.

सार्थक म्हणजे ओवीच्या मामा-मामींना लग्नानंतर दहा वर्षांनी झालेलं अपत्य. त्यामुळे तो ओवीपेक्षा चार वर्षांनी लहानच होता. नुकतीच अकरावीची परीक्षा पार पडली होती. ओवीला त्याचा खुप लळा होता. तो अगदी पाळण्यातला असल्यापासून! त्याच विचारात तिचा डोळा लागला. रात्रभर तिला चित्र-विचित्र स्वप्न पडत होती. अनेक तुकडे असलेली स्वप्न सकाळ झाल्यावर काही आठवेना. फक्त सकाळी उठल्यावर प्रथम तिच्या मनात आलं की सार्थकवर कथा लिहायची आणि या विचाराने तिला एकदम हलकं वाटलं. जणु तिच्या मनातल्या कुटील प्रश्नाचं उत्तर सापडलं होतं.

“ताई, सुट्टीचा प्लान केलास की नाही? ” घरी आल्या आल्या दिवाणखान्यात कार्टुन बघणाऱ्या सार्थकने ओवीला विचारले. परीक्षा झाल्याने त्याला सुट्टी पडली होती.

“ताईला प्रश्न विचारण्यापेक्षा तु बारावीच्या क्लासचं बघ. पुढच्या आठवड्यात सुरु होतील. कार्टुन कसलं बघतो आहेस? ” किचनमधून वाफाळलेल्या कॉफीचे मग आणि बिस्किटे डायनिंग टेबलवर मांडत मामी म्हणाल्या.

“ए काय गं आई, मला नाही क्लासला जायचं. मी तुला हवे तेवढे टक्के मिळवून देतो असं आधीच सांगितलं आहे, ” सोफ्यात अधिकच रेलत सार्थक म्हणाला.

“बाकी हे मात्र खरं आहे मामी, आपला सार्थक हुशार आहे. दहावीला कोणताही क्लास न करता बोर्डात आलेला, ” कॉफीचा आस्वाद घेत ओवीने सांगितलं.

“लव्ह यु सिस्टर. या घरात तुलाच काय ते माझी काळजी. ”

“काही काळजी नको, मी क्लासमध्ये नाव नोंदवलं आहे. सायन्स शाखेमध्ये मार्कस मिळतील तेवढे थोडे. हव्या त्या कॉलेजमध्ये ॲडमिशन मिळायला हवं, ” मामींच्या हट्टापुढे सार्थकची कुरकुर चालली होती.

“मग राधिकाच्या घरी मासे होते की कोलंबी? ” संभाषणात सामील होत मामांनी मिश्कीलपणे विचारलं.

“दोन्ही, ” मंद स्मित करत ओवी म्हणाली.

“बाबा, तुम्ही आणि आई पार्सेलीटी करता आहात. ताईला हवं ते खाता येते मला मात्र साध अंड ही वर्ज्य आहे. ”

“अरे परवाच रोहितबरोबर एग बिर्याणी खाऊन आलास ना! उगाच नाटक नको करू आणि आता डायनिंग टेबलवर येवून आमच्या बरोबर कॉफी पी, ” मामांनी फर्मान काढल्याने सार्थक त्यांच्यात येऊन बसला.

“सुट्टीचं आणि पुढचं नियोजन केलं आहेस का? ” मामानी ओवीला उद्देशून विचारले.

“जरनॅलीजमचा कोर्स करणार आहे. साधारण पंधरा महिन्यांचा असतो. मी माहिती काढली आहे. तोपर्यंत सुट्टीत एखादी नोकरी करेन म्हणते, ” ओवी नम्रपणे म्हणाली. मामांसमोर बोलताना तिला अधिकच ऋणात असल्यासारखं वाटे.

“कोर्ससाठी पैसे जमवणार आहेस का? गेली तीन वर्ष माझ्या विरोधाला न जुमानता तू नोकरी केलीस. मला सर्व समजते . ह्या सुट्टीमध्ये असा विचारही करायचा नाही. त्यापेक्षा कुठेतरी फिरायला जा. एक कर पुण्यात तुझ्या मावशीकडे जा. वाटल्यास राधिकाला सोबत घे. मात्र यावेळी नोकरी करायची नाही, ” मामांच्या निर्णयापुढे ओवीचा नाईलाज झाला.

“ठीक आहे. मी मावशीकडे काही दिवस जाऊन येते. राधिकाला विचारते, ती येणार असली तर घेऊन जाईन, ”

मावशीकडे पुण्याला जायचे ठरले. राधिका तयार झाली. ओवीलाही बरं वाटलं. तिची मावशी म्हणजे पक्की सदाशिव पेठेतील पुणेकर होती. जाताना सार्थक थोडासा हळवा झाला.

“ताई लवकर ये, मला तुझ्याशिवाय करमणार नाही. ”

“हो मी लवकरच येते आणि येताना तुझ्यासाठी गिफ्ट आणणार आहे, ” ओवी त्याचे गाल ओढत म्हणाली. तसा त्याचा चेहरा खुलला.

“हे वन्संना दे, रव्याचे लाडू केले आहेत आणि सावकाश जा, ” मामींचाही आवाज कापरा झाला. ओवी तशी पहिल्यांदाच एवढ्या दिवसांसाठी कोणाकडे जात होती. मावशीने इतके दिवस बोलावून देखील तिला नोकरीमुळे जाता आले नव्हते. बऱ्याच वर्षांनी असा मोकळेपणा मिळाला होता. त्यात आता राधिका सोबत होती, त्यामुळे अगदी दुग्धशर्करा योग जुळून आला होता.

ट्रेनने अवघ्या तीन चार तासांचा प्रवास होता. शिवाजीनगर स्टेशनवरच साहिलदादाला मावशीने पाठविले होते. ओवीपेक्षा तीन वर्षांनी मोठा असलेला साहिल एअरफोर्स मध्ये अधिकारी होता. सध्या सुट्टीमध्ये घरी आला होता. त्यांना ट्रेनमधून उतरलेले पाहून त्याने हात हलवला.

“कोण आहे गं तो मुलगा? ” राधिकाने ओवीला कोपराने मारत विचारले.

“माझा मावसभाऊ, साहिल देशपांडे एअरफोर्स मध्ये अधिकारी आहे. आता सुट्टीचा आला आहे, ”

"फारच हॅंडसम आहे हो, " राधिका डोळे मिचकावत म्हणाली. तसे ओवीला हसू आले.

"तुला आवडला आहे की काय? " ओवीने मुद्दाम डोळे मोठे करत विचारले.

"कोणालाही आवडेल असाच आहे" राधिका एवढंच बोलली. तिचे गाल आरक्त झाले होते. साहिलने पटकन पुढे येऊन त्या दोघींच्या बॅग्स लीलया उचलल्या.

"प्रवास निट झाला ना? आई केव्हाची वाट पाहते आहे. मगापासून तीनवेळा फोन येऊन गेला, " साहिलने आपुलकीने विचारले. त्याचे लक्ष राधीकाकडे गेले. कुरळया केसांच्या गोड दिसणाऱ्या राधीकाकडे तो पहातच राहिला. ओवीने खाकर्ल्यासारखे केले आणि दोघेही लाजले.

"चला कार बाहेर पार्क केलेली आहे, " असे म्हणत तो चालू लागला. ओवीच्या मनात आलं, खरेच यांची जोडी लक्ष्मी नारायणासारखी दिसेल. एकूणच पुण्यनगरीत झालेलं त्यांचे आगमन योग्य होते.

मावशीने दोघा मुलींची दृष्ट काढली आणि ओवीला अगदी घटट मिठीत घेत म्हणाली, “आता महिनाभर जायचं नावच काढायचं  नाही. पुढचे पुढे, ” तिच्या आर्जवी बोलण्यावर ओवीने मान डोलावली. मावशीचे घर टुमदार होते. घराभोवती छोटीशी बाग होती. बागेत नाना तऱ्हेची फुलझाडे होती. बाहेर मोठी गॅलरी होती. तिथे छानसा झोपाळा होता. दिवाणखान्याला लागून देवखोली होती. त्यात पांढराशुभ्र संगमरवरी देव्हारा आणि त्यात गजाननाची गोंडस मूर्ती होती. तिला पांढऱ्याशुभ्र मोगऱ्याचा हार घातला होता. धूप दीपाने वातावरण अधिकच प्रसन्न झाले होते. स्वयंपाकखोली आधुनिक उपकरणांनी सजली होती. मधल्या पॅसेजला लागूनच दोन बेडरूम होते. पॅसेजमधून वर जाण्यासाठी जीना केला होता. वर एकूण चार प्रशस्त रूम केले होते. सर्वांमध्ये एक कॉमन व्हरांडा होता.

मुंबई पुणे तसा लहानच प्रवास असल्याने प्रवासाचा शिण नव्हता. त्यातही एवढा प्रशस्त बंगला बघून ओवीपेक्षा राधिका खुश झाली.

“छानच बंगला आहे गं, मला फार आवडला. ”

“माझे काका आर्किटेक्चर आहेत ना, ” ओवी पुढे सांगणार इतक्यात खालून मावशीची हाक आली, त्यामुळे दोघी फ्रेश होऊन खाली आल्या. डायनिंग टेबलवर गरम गरम कटलेट्स आणि पुदिन्याची चटणी आकर्षक प्लेट्स मधून ठेवली होती. सोबत वाफाळलेला कॉफीचा मग देखील होता. दोघीही सहालाच निघाल्या होत्या. हे सर्व पाहून त्यांना पोटातल्या भुकेची जाणीव झाली. मान खाली घालून त्या खाण्यात गुंतून गेल्या.

“मावशी कटलेट्स स्वादिष्ट बनली आहेत, ” ओवीने मनापासून दाद दिली.

“अहो मॅडम, मी बनवली आहेत, ” शेफसारखा पोशाख घातलेला साहिल पुढे झाला. मावशीच्या चेहऱ्यावर प्रचंड कौतूक दिसत होते.

“खरंच की काय? ए दादा यु आर ए मास्टर कुक, ” ओवी कमरेत वाकत म्हणाली.

“उगाच नाटक करू नकोस. खरी प्रतिक्रिया दे, ” साहिलने मनापासून विचारले.

“ओवी म्हणते ते खरे आहे. मी अशी चविष्ट कटलेट्स प्रथमच खात आहे, ” राधिकाने प्रांजळ कबुली दिली. तशी साहिलची कळी खुलली. तो गालातल्या गालात हसला. ओवीने मुद्दाम खोकून आपल्या लक्षात आल्याचं  दाखवलं, तर मावशीला वाटले तिला ठसका बसला त्यामुळे तिने तिला पाणी प्यायला लावले. अशाप्रकारे मावशीच्या घरचं  आगमन एकूणच आनंदाचं  ठरलं होतं.

संध्याकाळी घरातल्या स्कुटीवरून ओवी आणि राधिका पर्वतीला गेल्या. पर्वतीच्या पायऱ्या मोजत, सेल्फी काढत चढताना दोघींची चांगलीच दमछाक झाली होती. मात्र वर गेल्यावर सर्व थकवा दूर झाला. साधारण १०० पायऱ्या चढल्याने दोघींनाही सार्थक वाटले. ओवीने गुगलवर पर्वती देऊळ आणि इतर परीसराबद्दल माहिती सर्च केली. ज्या स्थानाला आपण भेट देतो त्याबद्दल आपल्याला थोडीतरी माहिती असावी अशी तिची भावना होती. अल्पावधीतच गुगलने पुरवलेली माहिती ती वाचू लागली, “पर्वती देवळाची स्थापना नाना साहेब

पेशवे यांनी १७४९ मध्ये केली होती. मंदिर परिसरात पेशवे मुझीयम होते. ज्यात पुराणातील बऱ्याचश्या वस्तू उपलब्ध होत्या. उदा. शस्त्रे, नाणी, लिखित माहिती. ” दोघींनी मुझीयमला आवर्जून भेट दिली.

मावळतीचा सूर्य आणि समोर पसरलेले पुणे शहर. रस्त्यावरून धावणारी वाहने, माणसे, उंच उंच बिल्डींग्स इ. सर्वच विहंगम दिसत होते. आजूबाजूला बरीच वर्दळ असूनही, दोघीना शांत वाटत होते. बराचवेळ त्या मूकपणे मावळतीच्या लालबुंद सूर्याकडे पहात होत्या. अखेर त्यांच्यातली नि:शब्दता राधिकाने मोडली.

“ओवी बरं झालं तू मला घेऊन आलीस. मी याआधीही पुण्याला आले आहे, अगदी पर्वतीला सुद्धा आले आहे. पण तुझ्या बरोबरचे क्षण मला नेहमीच अनमोल वाटतात. आपल्यात गेल्या जन्मी नक्कीच काहीतरी ऋणानुबंध आहेत. त्यामुळेच आपण आज एवढ्या जवळ आहोत. ”

ओवीने तिचा हात आपल्या हातात घेतला. तिच्या चेहऱ्यावर मंद स्मित पसरले. कधीकधी शब्दांपेक्षा स्पर्शच अधिक बोलके असतात.

दोघींना घरी यायला आठ वाजले. मावशी वाटच बघत होती. स्वयंपाक तयार होता. मावशी मात्र कसलीतरी तयारी करत होती.

“काय ग? कसली तयारी चालली आहे? आणि साहिल दादा कुठे आहे? ” ओवीने इकडे तिकडे पहात विचारले. खरंतर घरात आल्यापासून राधीकाचे डोळे त्यालाच शोधत होते हे तिच्या लक्षात आले होते.

“अगं उद्या सौमित्र येतोय. साहिल त्यासाठीच गेला आहे, ” आंबोळयांसाठी तांदूळ वाटताना मावशीने माहिती पुरविली.

“हा सौमित्र कोण दादाचा मित्र का? ” ओवीने न समजून विचारले. “अगं हो बाई तू कुठे ओळखतेस त्याला. साहिल बरोबरच मोठा झाला. तू लहान असताना यायचीस, तेव्हा तुम्ही दोघं खुप भांडायचा. इथेच शेजारी रहायचे कुलकर्णी. आठवतं का? ” ओवीला विशेष आठवत नव्हते. परंतु लहानपणाच्या आठवणींनी तिच्या मनातल्या आई-वडिलांच्या स्मृती जाग्या झाल्या.

“सौमित्र मूळचाच अत्यंत कुशाग्र होता. वडील एस. बि. आय. मध्ये ब्रँच मेनेजर होते. त्यांची गुजरातला बदली झाली तेव्हा तो दहावीत होता. दहावीचं वर्ष बुडू नये म्हणून आम्हीच त्याला आमच्याकडे ठेवले. तसंही साहिल आणि सौमित्रचं एकमेकांशिवाय पानही हलत नसे. अकरावीत मात्र तो गुजरातला निघून गेला. त्यानंतर अमेरिकेला गेला. चार वर्षांनी काल भारतात आला आणि लगेचच उद्या आमच्याकडे. आता ते पुण्यातच स्थाईक झाले आहेत. साहिल त्याच्याच घरी गेलाय. उद्या त्याला घेवून येईल. त्याला आंबोळया खुप आवडतात, ” मावशी मनापासून बोलत होती. ओवीच्या नजरेसमोर सौमित्रची काल्पनिक मूर्ती साकारली. तिने आजवर कधीही कोणा मुलाचा विचार केला नव्हता. आपल्याच विचारांचे तिला आश्चर्य वाटले.

जेवून झाल्यावर दोघीजणी झोपायला आल्या. राधिकाची अखंड बडबड सुरु होती. पण ओवीला प्रचंड झोप येत होती. तिला राधिकाचे बोलणे समजत

नव्हते. “नुसतच हुहू काय करतेस? बोल ना, ” “अगं मला खुप झोप येतेय. आपण उद्या बोलूया प्लीज. ” ओवी एवढंच कसंबसं म्हणाली आणि डोळे मिटताच ती अंधाराच्या डोहात बुडून गेली.

*समोर आई-बाबांना बघून ओवीचा आनंद गगनात मावेना. ती तशीच त्यांना बिलगली. आईने तिच्या आवडीचे रसगुल्ले बनविले होते. आईच्या साईसारख्या मऊ हातांनी तिने ते खाल्ले. मग तिच्या मांडीवर डोके टेकून तिने आनंदातीशयाने डोळे मिटले. परंतु क्षणभरच काय ते सुख तिला अनुभवायला मिळाले. काहीतरी वस्तू तिच्या चेहऱ्यावर आपटली आणि ती दचकून उठली. समोर सार्थक उभा होता आणि तो ओवीच्या आई-बाबांना कुठेतरी चलण्यासाठी सांगत होता. त्याने मारलेला चेंडू ओवीच्या बाजूलाच पडला होता. ओवीला काही समजण्याच्या आत तिचे आई-बाबा सार्थक बरोबर जावू लागले. ओवी त्यांना थांबविण्यासाठी त्यांच्या मागे धाऊ लागली. परंतु ती कीतीही जोरात धावली तरीही त्यांच्यामधलं अंतर वाढतच जाऊ लागल. ती जीवाच्या आकांताने सर्वांना थांबण्यासाठी ओरडत होती. पण आता सार्थक आणि तिचे आई-बाबा द्रुष्टीआड गेले होते.*

“ओवीSSSS ओवीSSSS, ” ओवीला जाग आली. राधिका तिला हलवत होती. तीचे सर्वांग घामाने डबडबले होते.

“अगं काय झालं, तू काहीतरी विचित्र ओरडत होतीस आणि हे काय तुला केवढा घाम आला आहे? ” राधिकाने काळजीने विचारले.

“काही नाही गं स्वप्न पडलं! मला थोडं पाणी दे ना!” बिछान्यावर उठून बसत ओवी म्हणाली. राधिकाने दिलेला ग्लास रिकामा केल्यावर तिला बरे वाटले. परंतु तिला राधिकाच्या चेहऱ्यावरचे आश्चर्याचे भाव बघून काही अर्थबोध होईना न रहावून तिने विचारले

“काय झाले? अशी काय बघतेस? ”

“काल तुला एवढी झोप आली होती, तर मग रात्री तू काय लिहित बसली होतीस? ”

“मी लिहित होते? मला कसे आठवत नाही, ” ओवीला कमालीचे आश्चर्य वाटले.

“काहीतरी तुझं, मी घड्याळात पाहिलं तर एक वाजला होता. मी तुला हाक देखील मारली पण तुझं लक्ष नव्हत. मग मी झोपले. ” राधिका पांघरुणाची घडी करत म्हणाली. परंतु ओवीला रात्री उठल्याचं अजिबात आठवत नव्हत.

“मी कुठे बसले होते? ” तिच्या या अनपेक्षित प्रश्नाने राधिका बुचकळयात पडली. तिने जवळच असलेल्या टेबल-खुर्चीकडे बोट दाखविले. तिथे एक डायरी आणि पेन होते जे आदल्या दिवशीच पर्वती वरून येताना ओवीने विकत घेतले होते. ती चालत टेबलाजवळ गेली आणि डायरी उघडणार इतक्यात मावशी खोलीत आली. “तुम्हा दोघींना किती हाक मारतेय. साहिल आणि सौमित्र आले आहेत, चला बघू आणि हे काय ओवी तू आता उठलेली दिसतेस. चल बघू मी गरम गरम आंबोळी आणि चटणी वाढतेय, ” असं म्हणत मावशीने ओवीच्या हातातली डायरी टेबलवर ठेवली व दोघींना घेवून ती खाली आली.

दिवाणखान्यात हास्याचे कारंजे उडत होते. “ए दिन्या आठवतो? काय करतो सध्या? ” सौमित्रने विचारले.

“आठवतो काय? मी सर्वांच्या काँटॅक्ट मध्ये आहे. गेल्याच महिन्यात भेटला होता. त्याचा स्वत:चा फिटनेस क्लब आहे. संध्याकाळी जाऊया आपण. अरे

या सरकार आज उशिरा उठलात आपण, ” समोरून येणाऱ्या ओवीकडे पहात साहिल मिश्कीलपणे म्हणाला. तसे सौमित्रने वळून पाहिले आणि ओवीकडे तो पाहतच राहिला.

“अरे सौमित्र ही ओवी बरं का. लहानपणी दोघ नुसते भांडायचा. आठवली का? ” मावशीने ओळख करून दिली. तशी ओवी भानावर आली. मघापासून तिच्या डोक्यात डायरीचे विचार घुमत होते. समोर उभ्या असलेल्या सौमित्रकडे तिचे लक्षच नव्हते. आता तिने नजर वर करून पहिले तर तिच्या कल्पनेपेक्षा सौमित्र अधिकच रुबाबदार होता. सावळा वर्ण, धारदार नाक, काळया-भोर भुवया, डोक्यावर दाट काळे कुरळे केस आणि साधारण सहा फुट उंची यामुळे तो अधिकच देखणा वाटत होता. त्याच्या डोळयावरचा फ्रेमलेस चष्मा आणि चेहऱ्यावरचं बुद्धिमत्तेचं  तेज हे त्याच्या व्यक्तिमत्वाला अधिकच खुलवत होतं. ओवीच्या चेहऱ्यावर मंद स्मित आले. तिने हात जोडून नमस्कार केला. प्रत्युत्तादाखल सौमित्रचेही हात जोडले गेले. मावशीने राधिकाची ओळख करून दिली

“मावशी मी जरा आवरून घेते. तोपर्यंत तुम्ही सुरु करा. ” ओवी मावशीच्या कानाजवळ येऊन पुटपुटली.

“आपण सगळे दुपारी बाहेर जातोय, ” जिन्याच्या पायऱ्या चढणाऱ्या ओवीची पावले थबकली. सौमित्र तिला ऐकू जाईल अशा आवाजात बोलला होता की आपल्याला उगीचच भास झाला हे तिला समजेना. आपसूकच तिने मागे वळून पहिले. तेव्हा सौमित्र तिच्याचकडे पहात होता. एक क्षण त्यांची नजरानजर झाली. या व्यक्तीशी आपली खुप जुनी ओळख असल्यासारखे तिला वाटले. त्या नजरेत आपुलकी, जिव्हाळा, मैत्री आणि अनेक न समजणाऱ्या परंतु हव्याहव्याश्या वाटणाऱ्या भावना होत्या. ओवी खोलीत आली तरी सौमित्रची नजर तिचा पाठलाग करतेय असं तिला वाटलं. तिने यंत्रवत सर्व आटोपले. सौमित्रचा हसरा

चेहरा तिच्या डोळयांसमोर तरळत होता. त्याला पाहिल्यापासून तिच्या संवेदना गोठल्यासारख्या झाल्या होत्या. तयारी होऊनही खाली जायची तिची हिम्मत होईना. ती तशीच खिडकीच्या कठड्यावर बसून राहिली. खालून सर्वांच्या बोलण्याचे, हसण्याचे, ओरडण्याचे आवाज येत होते. डोळे मिटून ती ऐकत राहिली. बराच वेळाने कोणाच्यातरी हाताचा तिच्या खांद्याला स्पर्श झाला. “तू खाली का आली नाहीस? वाट बघून मी तुझ्या आंबोळया वर घेऊन आले. चल खावून घे. ” राधिकाने जवळचे टीपॉय ओढले आणि त्यावर आंबोळया, चहाचा ट्रे ठेवला.

“सौमित्र तुला विचारत होता. मला वाटलंच अशी तू कोशात बसली असणार ते. नवीन माणसात तुला पटकन मिक्स होता येत नाही, ” राधिका आपुलकीने म्हणाली.

“थँक्स राधा. मला जरा सौमित्र समोर संकोचल्यासारखं वाटलं असतं. अजून ओळख नाही. लहानपणीचं मला काही आठवत नाही, ” मनातले विचार झटकत ओवीने चहाचा कप तोंडाला लावला.

“सौमित्र बाकी भारीच आहे हा. एवढं नॉलेज आहे त्याला, खुप ठिकाणी फिरलाय तो. त्यात वाचनाची आवड. आपल्या फिल्डचीही त्याला माहिती आहे. त्याने मला दोन-तीन चांगले कोर्सेस सांगितले, ” राधिका बोलत होती. ओवीला खुप छान वाटत होतं.

“अरे वा. वाटतोच तो हुशार, पण अश्या व्यक्तीसमोर मला थोडं दडपण येत गं. '”

“ओवीSSSS ओवीSSSS” साहिलच्या हाकेचा आवाज आला आणि त्याचबरोबर सौमित्रही तिच्या खोलीत आला. “अरे देवा आपलं शेवटचं वाक्य त्याने एकले तर नसेल, ” ओवीच्या मनात आले.

“अगं काय हे! आम्ही सर्वांनी खाली एकत्र बसून नाश्ता केला आणि तू इकडे, ” साहिलने जवळच्या खुर्चीवर बसकण मारली तर सौमित्र फक्त हाताची घडी घालून उभा राहिला.

“नाही अरे सहजच. मला जरा आवरायला उशीर झाला, ” ओवीने सारवा सारव केली.

“आई जेवायला येत नाही. तुम्ही मुलं जा असं म्हणतेय. आत्ता १० वाजलेत. आपण जरा भटकुया. मग दुपारी जेवून येऊ, दोघीही चटकन तयार व्हा, ” साहिल उठत म्हणाला आणि खाली निघून गेला सौमित्र मात्र तिथेच थांबला होता.

“मी जरा हा ट्रे ठेवून येते, ” असे म्हणत राधीका खाली निघून गेली, ओवीला तिचा खुप राग आला. आता तिच्यासमोर सौमित्रशी बोलण्यावाचून पर्याय नव्हता.

“ओके म्हणजे माझे दडपण वाटते तर तुला. पण बोललोच नाही तर स्वभाव कसा समजणार आणि दडपण कमी कसे होणार? ” हळूवार शब्दात सौमित्रने विचारले. तशी ओवीच्या हृदयाची धडधड उगाचच वाढली. म्हणजे त्याने ऐकले होते. मलमपट्टी करत ती म्हणाली,

“नाही तसं नाही, अनोळखी माणसाबद्दल मला जरा तसंच वाटतं. तुम्ही राग मानू नका, ” तिच्या शेवटच्या वाक्यावर सौमित्र मनमुराद हसला. हास्य हे संसर्गजन्य असते असं म्हणतात. तिच्या चेहऱ्यावरदेखील स्मित उमटले.

“मुळात मला राग शक्यतो येत नाही आणि आवडणाऱ्या व्यक्तींचा तर नाहीच, ” पुढे मग भलतच बोलल्याचं लक्षात आल्याने जीभ चावत तो म्हणाला,

“फ्रेंड्स? ” ओवीला हसू आले. तिने मान डोलावली.

“मैत्रीत अहो जाहो नसते हा. माहितीसाठी सांगतो, ” सौमित्र मिश्कीलपणे म्हणाला.

“मी लक्षात ठेवीन, ” ओवी हसत उत्तरली. त्या दिवसापासून सौमित्र, ओवी, राधिका आणि साहिल यांचा एक चौकोन तयार झाला. चौघेही एकमेकांत मिसळून गेले. सौमित्रचं मित्र कधी झालं हे ओवीला कळलेच नाही. सुट्टीचा सर्वजण आनंद लुटत होते. मावशी-काकांच्या छत्र छायेत कित्येक वर्षांनी ओवी दिलखुलास हसत होती. तिच्या मनात सौमित्रबद्दल प्रेमभावना निर्माण झाली होती. परंतु मनातली प्रीती ओठांवर आणायची तिची हिम्मत होत नव्हती.

आदल्या दिवशीच सौमित्र आपल्या बंगल्यात रहायला गेला होता. इतके दिवस त्याच्या सहवासाची ओवीला सवय झाली होती. तिला त्याच्या शिवाय अजिबात करमत नव्हते. मावशी तिच्या मैत्रिणीकडे गेली होती. काका कामानिमित्त फिरतीवर होते. दुपारची वेळ होती. राधिका झोपली होती. ओवीचा वेळ जात नव्हता.

तिने वॉट्स ॲप ओपन केले आणि सौमित्रला मेसेज केला. परंतु तो ऑनलाईन नव्हता. त्याला घरी असताना फोन करणे तिला प्रशस्त वाटेना. तिने जवळच असलेली गृहशोभिका उचलली. मरगळल्यासारखी ती एक एक पान उलटू लागली. बाहेर चांगलच ऊन पडलं होते. तिची नजर एका लेखावर गेली. प्रसिद्ध लेखिकेच्या जीवनावर आधारित तो लेख होता. ती लेखिका तिला स्वत:ला खुप आवडत असे. त्या मुळे एका दमात संपूर्ण लेख तिने वाचून काढला. लेखन हाच श्वास मानणारी आणि त्याच आवडीने तिला मिळवून दिलेली प्रसिद्धी, वाचक वर्गाकडून आलेल्या हजारोंनी प्रतिक्रिया, सर्व चांगले-वाईट प्रसंग त्या लेखात मांडले होते. ओवी भारावून गेली. तिला राधिकाच्या घरी आलेले आचार्य काका आठवले आणि अकस्मात तिला त्या दिवशीचा सकाळचा प्रसंग आठवला. रात्रभर आपण काहीतरी लिहित होतो असे जे राधिकाने तिला सांगितले होते ते आठवले. ती कमालीची आश्चर्यचकित झाली. सौमित्रच्या नादात ती ही गोष्ट साफ विसरून गेली होती. तशीच उठून ती टेबलाजवळ आली. टेबलाच्या खालच्या कपाटात, टीपॉयवर, बॅग्समध्ये सर्वत्र तिने शोधले. पण तिला डायरी कुठेच सापडली नाही. आवाजाने राधिकाला जाग आली.

“ओवी काय झालं? काय शोधतेस? “

“राधा तुला आठवतंय मी एक डायरी आणली होती? तु ती कुठे पाहिली आहेस का?

“नाही गं टेबलवरच तर होती, तिथेच कुठेतरी असेल, ” पण ओवीला चैन पडेना. तेवढ्यात तिच्या फोनचा बिप असा आवाज आला. तिने चेक केलं तर सौमित्रचा मेसेज होता.

“आईस्क्रीम खायला जाऊया? ” त्या मेसेज मध्ये जादू होती. सकाळपासूनचा सगळा मरगळलेपणा क्षणार्धात नाहीसा झाला. काही वेळेपूर्वी व्हायला लागलेली चिडचिड गायब झाली. ओवीची कळी खुलली. “आय एम रेडी” तिने रिप्लाय दिला.

“मी दहा मिनिटांत पोहोचतो, ” पलीकडून मेसेज आल्यावर तिची तारांबळ उडाली. सर्वप्रथम तिने राधिकाला हलवले.

“राधा उठ सौमित्र येतोय. आईस्क्रीम खायला जाऊया म्हणतोय. ”

“ओवी माझे डोके दुखतेय. तुम्ही जा. ” राधाचा आवाज जड येत होता. ओवीने तिच्या कपाळाला हात लावला तर थोडंसं गरम वाटत होते. “अरे देवा, तुला ताप आलाय, ” ओवी काळजीने म्हणाली.

“मी झोपते. थोड्यावेळाने मला बरे वाटेल. तू जा. ”

“असं कसं तुला सोडून जाऊ? शक्य नाही. मी मित्रला सांगते, येऊ नको म्हणून. , ” ओवी फोन उचलत म्हणाली. राधिकाने तिच्या हातातला फोन हिसकावून घेतला.

“हे बघ मला काही एवढं झालेलं नाही. तू जा. मी गोळी घेतलेली आहे, ” ओवीचा नाईलाज झाला. ती तयार झाली. गुलाबी रंगाचा टॉप आणि त्याखाली

पांढऱ्या रंगाचा स्कर्ट तिने घातला. बॉब केलेल्या केसांना कीटकॅट क्लिप लावली. चेहऱ्यावर पावडरचा हलकासा हात लावला आणि छोटीशी टिकली लावली.

“आज बहुदा सौमित्र मागणी घालेल, ” राधिका हसत म्हणाली. तसे ओवीचे गाल आरक्त झाले.

“काहीतरीच काय? आमच्यात चांगली मैत्री आहे, बस. ”

“उगाच वेड पांघरून पेडगावला जाऊ नकोस. त्याचं  नुसत नाव घेतले तरी तुझ्या गालावर गुलाब चढतो, ” राधिका पांघरूण अधिकच घट्ट ओढत म्हणाली.

“त्याला डॉक्टर मुलगी हवी आहे, तुला माहिती आहे ना ? ” उदास होत ओवीने सांगितले.

“आणि तुझं काय? ओवू खरं सांग. ”

“मला तो फार फार आवडतो. पण मी डॉक्टर नाही, ” ओवीचा चेहरा उतरला.

“अब आया ऊंट पहाडके नीचे. मॅडम तुला पाहिल्यापासून मिस्टर डॉक्टरची आवड बदलली आहे. आता त्याला मिस ओवी अभ्यंकरांशी लग्न करायचे आहे, ” राधिकाने रहस्यस्फोट केला. ओवी डोळे विस्फारून पहायला लागली.

“तु एवढ्या खात्रीने कशी सांगू शकतेस? ” तिच्या जवळ जात ओवीने अधिरतेने विचारले.

“साहिलने मला सांगितले. बातमी १०० टक्के खरी आहे, ” राधिका हसत म्हणाली.

“कधी? ” ओवीने तिला हलवत विचारलं आणि खाली सौमित्रच्या हॉर्नचा आवाज ऐकू आला.

“मॅडम जा नाहीतर हॉर्न बंद पडेल, ” राधिका डोक्यावरून पांघरूण घेत म्हणाली.

खालून सौमित्रची हाक ऐकू आली, “ओवी लवकर चल ना, ” तशी ओवी उठली.

तरी जाताजाता राधीकेची कोपरखळी तिला ऐकू आली, “उतावळा नवरा गुडघ्याला बाशिंग, ”

तसं तिने कृतककोपाने एवढंच म्हटलं, “राधे गप ना, टेक केअर, ” आणि ती दार आड करून खाली आली.

आज घरात कोणीही नव्हते त्यामुळे तिला काळजी वाटत होती. दरवाजा बाहेर सौमित्रच्या गाडीजवळ साहिल दादा होता. त्याला बघितल्यावर तिला बरं वाटलं. ती लहान मुलासारखी धावत त्याच्याजवळ गेली. दोघांच्या गप्पा अगदी रंगत आल्या होत्या तिला बघून दोघेही गप्प झाले. “बरं झालं दादा तू आलास, ” तिच्या काळजीयुक्त स्वराने साहिलच्या भुवया वर गेल्या.

“काय गं काय झालं? ” त्याने विचारले.

“राधिकाची तब्येत बिघडली आहे. ताप आलाय. ”

“बरं मी बघतो. आई आहे का? ” साहिलने विचारले. “मावशी घरी नाही. मला काळजी वाटते. ”

“तु मस्त एन्जोय कर. मी तिला डॉक्टरकडे घेऊन जातो, ” साहिलने ओवीच्या डोक्यावर मायेने थोपटले. तसं तिला बरं वाटलं. तिचं लक्ष सौमित्रकडे गेल. तो डोळयांनीच बोलला, “काळजी नसावी. ”

कारमध्ये सौमित्रच्या शेजारी बसल्यावर ओवीला राधिकाचं बोलणं आठवलं. सौमित्रने साहिलदादाला खरंच सांगितलं असेल का?

“कसला विचार करते आहेस? राधिकाचं टेन्शन नको घेउस साहीलला बघितल्यावरच तिला बरं वाटेल.” गाडी स्टार्ट करत सौमित्र म्हणाला.

“म्हणजे मी समजले नाही, ” ओवीने गोंधळून विचारले.

“अहो मॅडम मनाजोग्या व्यक्तीच्या सहवासाने आपोआप बरं वाटतं. ” ओवीच्या मनात आलं ’खरेच आहे, आवडती व्यक्ती जेव्हा दूर जाते तेव्हा राहवत नाही. सौमित्रही घरी गेल्यापासून तिला चैन पडत नव्हत”.

आईस्क्रीम पार्लरकडे सौमित्रने कार पार्क केली. छानशी जागा बघुन दोघेही बसले.

“मग कालपासून काय काय केलेस? ”

“अरे तू घरी गेल्यापासून मला अजिबात करमत नाही. गेले दहा-बारा दिवस आपण काय धमाल केली ना? ” ओवी मनापासून म्हणाली तसं सौमित्रच्या मनात आलं आपल्याला तरी कुठे करमतय? म्हणूनच तर शेवटी भेटायला आलो.

“मी मेसेज केला तेव्हा झोपली नव्हतीस ना? ” त्याने विचारले.

“अरे मॅगझीन वाचत होते. एका लेखिकेचा लेख आला होता त्यांचा जीवनपट थोडक्यात सांगितला होता”

“अरे ओवी तुला आठवतं? लहानपणी तू छान कविता करायचीस. हल्ली काही लिहितेस की नाही? ” वेटरला ऑर्डर देऊन सौमित्रने विचारले. आपल्या आवडी-निवडी सौमित्रच्या लक्षात आहेत हे ऐकून ओवीला बरे वाटले.

“अरे गम्मतच झाली, मी लिहायला सुरुवातच करायचं ठरवलं होतं. त्यासाठी डायरीपण घेतली होती पण ती कुठे सापडतच नाही. ”

“हात्तीच्या, एवढं च ना अगं मग दुसरी घे. आजपासूनच श्रीगणेशा कर. ”

“तसं नाही रे, राधिका म्हणते मी त्या डायरीमध्ये काहीतरी लिहीलं आहे. मला आधी ते वाचायचे आहे. थोडं विचित्रच आहे सगळं, ” वेटरने सर्व केलेल्या आईस्क्रीम कडे बघत थोड्याश्या तंद्रीतच ओवी उद्गारली.

“मी काही समजलो आही. तू स्वत: लिहिलेली गोष्ट तुला आठवत नाही? म्हणजे? ” खांदे वर करत सौमित्रने विचारले. तशा त्या रात्रीबद्द्ल राधिकाने सांगितलेले सर्वकाही ओवीने त्याला सांगितले. ते ऐकल्यावर सौमित्र थोडासा गंभीर झाला. “त्यानंतर तू लगेचच चेक नाही केलेस? ”

“अरे त्याच सकाळी तू आलास आणि मग मी डायरीचं विसरून गेले. आज इतक्या दिवसांनी तो लेख वाचल्यावर मला आठवण झाली, ” आयस्क्रीम खात ओवी म्हणाली. परंतु पेशाने डॉक्टर असलेल्या सौमित्रच्या चेहऱ्यावर थोडीशी चिंता पसरली. “या पूर्वी असं कधी झालं का? ” त्याच्या आवाजातला बदल जाणवल्यामुळे ओवीने चमकून त्याच्याकडे पाहिले.

“नाही रे तू उगाच पॅनिक होतो आहेस. राधिकाचा काहीतरी गैरसमज झाला असेल, ” ओवी त्याला समजावत म्हणाली.

यावर सौमित्रने मान डोलावली. त्यादिवशी गप्पांमध्ये संध्याकाळ झाली. बाहेर अंधारायला लागले, तसे दोघेही भानावर आले.

“चल निघूया. राधिका वाट बघत असेल. ए पण बरं झालं तू आलास ते. मला आता खुप बरं वाटतंय, ” प्रसन्न हसत ओवी म्हणाली. तिचं ते मोहक हसू पाहिल्यावर सौमित्रच्या मनात आलं, हिच्या ह्या हास्यासाठीच तर आपण एवढे भेटायला आलो. आपल्या मनातील भावना हिला सांगावी का?

“ओवी एक विचारू? ”

“विचार ना परवानगी कसली मागतो आहेस? ”

"तुझ्या वयाच्या मुलींचे आजकाल सर्रास बॉयफ्रेंडस असतात. तुला असा कधी कुणी आवडला का? " त्याच्या या अनपेक्षित प्रश्नाने ओवी गडबडली.

"नाही, माझे मित्र आहेत. कॉलेजमध्ये आमचा छान ग्रुप होता. पण प्रपोज असं कधी कुणी केलंच नाही. माझे आई –बाबा लहानपणीच वारले. तेव्हापासून मी मामा-मामीकडे मोठी झाले. बारावीनंतर पार्टटाइम नोकरी केली. त्यामुळे कॉलेज, नोकरी आणि घर याव्यतिरिक्त मन मोकळे करायचे ठिकाण म्हणजे राधिका! एवढेच माझे विश्व होते. आई-बाबा जाण्यापुर्वी सारखी मावशीकडे यायचे पण नंतर क्वचितच. मावशी, साहिल दादा मामांकडे आले की मगच काय ते बोलणे व्हायचे. एवढे मनातले कोणत्या मुलासमोर बोलले असेन तर तो तूच, " ओवीचे डोळे पाणावले. सौमित्रलाही उगाचच विचारल्यासारखे वाटले. तिच्या डोळयात तो पाणी पाहू शकत नव्हता. त्याने खिशातून झटकन रुमाल काढला आणि तिचे डोळे पुसले.

"ओवी यापुढे कधीही डोळयात पाणी आणायचे नाही. मला वाईट वाटतं, " त्याच्या बोलण्यातल्या आर्जवी भावनेचे ओवीला आश्चर्य वाटले. तिने इतक्या दिवसात केवळ हसवणारा सौमित्र पाहिला होता. आज त्याचं नवीन रुप ती पाहात होती. त्याच्या डोळयात काळजी बरोबर दुसरं काहीतरी होतं. प्रेम? ? ? का ते प्रेम होतं? का राधिका खरंच सांगत होती.

तिच्या डोळयासमोर टिचकी वाजवत सौमित्रने तिची विचार शृंखला तोडली.

"निघूया का? चल मी तुला घरी पोहोचवतो, " सौमित्र म्हणाला आणि दोघे उठले.

येताना कुणीच कुणाशी बोलत नव्हते. मावशीच्या घरी गाडी थांबवल्यावर ओवी उतरली आणि सौमित्रला निरोप देत, त्याची कार दिसेनाशी होईपर्यंत तिथेच थांबली. घरात प्रवेश केल्यावर दिवाणखान्यात साहिल आणि राधिका बसले होते. राधिकाचा चेहरा उजळला होता. ओवीला बघतच तिने सुहास्य वदनाने तिचं स्वागत केलं.

“तब्येत कशी आहे ग? ” राधिकाच्या कपाळाला हात लावत ओवीने विचारले.

“आता एकदम मस्त. आल्याचा मस्त चहा घेतला. मगाशीच डॉक्टरकडे जाऊन आले. इंजक्शन घेतलं. आता फ्रेश वाटतं आहे. ”

“”अरे व्वा. हे बाकी बरे केलेस. डॉक्टरकडे गेल्याशिवाय गुण येत नाही, बाई. सर्दी-पडसे ठीक आहे पण डॉक्टरकडे जाणे योग्य, ” ओवी जवळच्या सोफ्यात बसत म्हणाली.

“आईस्क्रीम कसं होतं? इतकावेळ काय बोलत होता? ” साहिलने ओवीची फिरकी घेत विचारले.

“असंच! काही खास नाही. गप्पा मारायला लागल्यावर सगळ्याचा विसर पडतो. राधा माझी डायरी पाहिलीस का? मागे तू म्हटलंस ना की मी रात्री उठून लिहित होते. त्यानंतर आज मला ते आठवलं. पण डायरी हरवली गं. दुपारी तेच शोधत होते. ” ओवीने विचारले.

“हा काय प्रकार आहे? ” साहिलने न समजून विचारले. ओवीने त्याला थोडक्यात सर्व सांगितले. पण त्याला ते पटले नाही.

“राधाला भास झाला असेल, ” साहिल बोलून गेला. त्याच्या तोंडून राधा हे नाव ऐकल्यावर ओवीला कमालीचं आश्चर्य वाटलं. साहिलच्याही ते लक्षात आलं. “तुम्ही बसा बोलत, मी जरा जाऊन येतो. ” विषय बदलत त्याने स्कुटीची चावी घेतली आणि तो निघून गेला. तो गेल्यावर ओवीने आपला मोर्चा राधीकाकडे वळवला. तिने प्रश्नार्थक नजरेने तिच्याकडे पहिले. तशी अंगावरची शाल बाजूला ठेवत राधिका उठली आणि ओवीला बिलगली.

“ओवी” तिच्या स्पर्शातून ओवीच्या सर्व लक्षात आले. “म्हणजे एकूण आजारपण फलदायी ठरलं आहे, ” तिचे विस्कटलेले केस नीट करत ओवीने विचारले.

“त्याने मला लग्नाची मागणी घातली आहे, ” चेहरा ओंजळीत लपवत राधिकाने सांगितले. तसा ओवीला प्रचंड आनंद झाला.

“मावशी खूपच खुश होईल. राधा तू खुप नशीबवान आहेस. माझा साहिल दादा लाखात एक आहे. मावशी किती प्रेमळ आहे हे तू पाहिले आहेस, ” यावर राधा फक्त प्रफुल्लीत चेहऱ्याने होकार देत होती.

त्यादिवशीच साहिलचे बाबा फिरती वरून आले. साहिलने थोडं भीत भीतच ही बातमी आई-वडिलांच्या कानावर घातली. सर्वजण खुश झाली. मावशीला तर राधिकाला कुठे ठेऊ आणि कुठे नको असे झाले होते. तिला प्रथम दर्शनीच राधिका आवडली होती. त्याचदिवशी राधिकाच्या घरी बोलणी करण्यात आली. साहिल विषयी राधिकाने अगोदरच घरी सांगितले होते. तिच्या घरच्यांनी पुढची बोलणी करण्यासाठी दुसऱ्यादिवशी पुण्याला यायचे ठरवले.

“मामी मामांना कळवायला हवं गं. बरेच दिवस मी घरी फोनच केला नाही. मामांचाही हल्ली फोन आला नाही, ” रात्री जेवताना ओवीने विषय काढला.

“अगं मी परवाच फोन केला होता. तेव्हा तुझी मामी म्हणाली अंकूची तब्येत बरी नाही. तिचाही आवाज मला जरा जड वाटला, ” श्रीखंडाची वाटी प्रत्येकाच्या ताटात ठेवत मावशी उत्तरली.

“अरे देवा. मी मामांना फोन करायला हवा होता. जेवल्यावर लगेच करते,”

“आता तू नीट जेव. उशीर झाला आहे. उद्या सकाळी फोन कर. तशी चार दिवसात तुम्ही निघतच आहात, ” मावशीने ओवीची समजूत काढली.

ओवी आणि राधिका झोपायला आल्या. आज दोघीही खुप खुश होत्या.

“सौमित्रला कळवलंस का? ” राधिकाने विचारले.

“अगं त्याला मेसेज केला होता. आता उद्या फोन करते. मला ना अनावर झोप यायला लागली आहे, ” जांभया देत ओवी म्हणाली. इतक्यात तिचा फोन वाजला. सौमित्रचं नाव बघून तिने थोडं आळसावतच फोन उचलला.

“ओवी अगं आत्ता तुझा मेसेज बघितला. राहवलं नाही म्हटलं फोन करूया. ”

“मित्र अरे मला खुप झोप येत आहे. आपण उद्या बोलूया प्लीज, ” ओवीला फोनवर बोलणं देखील जड व्हायला लागलं होतं.

“ओके झोप तू आपण उद्या बोलू. गुड नाईट, ” सौमित्रने थोड्या नाराजीनेच फोन ठेवला. ओवी मात्र लगेचच झोपली, अगदी गाढ! अंगावर पांघरूण घ्यायची देखील तिला शुद्ध राहिली नव्हती. राधीकानेच तिच्या अंगावर चादर घातली आणि लाईट बंद केली.

*स्वप्नांच्या सोनेरी दुनियेत ओवीने प्रवेश केला. त्यात ती, आई-बाबा आणि सार्थक एवढी माणसे होती. आपण नक्की कुठे आहोत ते तिला समजत नव्हते. सर्वत्र पांढऱ्या कपड्यातील माणसे फिरत होती. स्टेथस्कोप घातलेली*

*माणसे पाहिल्यावर तिला अंदाज आला की ते एक हॉस्पिटल होते. निरव शांतता होती. सार्थक आणि ओवीचे आई-बाबा रडत होते. ओवीला त्यांना विचारायचे होते पण तिला बोलताच येत नव्हते. अचानक त्यांच्या समोरचा दरवाजा उघडला गेला आणि तिला आतमध्ये कोणीतरी व्यक्ती दिसली. ओवी धडधडत्या हृदयाने खोलीत गेली. तिथे कोणीतरी बेडवर झोपले होते. ती व्यक्ती दुसरी तिसरी कोणी नसून तिची बालमैत्रीण राधिका होती. इतक्यात त्या खोलीत डॉक्टर आले आणि त्यांनी राधिकाच्या अंगावरची पांढरी चादर तिच्या चेहऱ्यावरून वर सरकवली. ओवी दचकून जागी झाली तिने बाजूला पहिले तर राधिका नव्हती. तिच्या हृदयातली धडधड कमालीची वाढली होती.*

तिने अंगावरची चादर भिरकावली आणि मावशीला हाक मारतच ती खाली आली.

"मावशी ए मावशी राधा कुठे? "

"अगं तिचे आई-बाबा येणार आहेत ना आज? म्हणून ती त्यांना आणायला स्वारगेटला गेली आहे, " मावशीने सांगितले.

"तिच्याबरोबर साहिल दादा आहे का? " ओवीच्या पोटात गोळा आला.

"नाही तो जात होता पण ती नको म्हणाली. एकटीच गेली. काय झालं? " आता मावशीही थोडी घाबरली होती. "काही नाही" ओवी तशीच धावत आपल्या खोलीत आली. तिने आपला फोन कुठे दिसतो का ते पाहिलं. रात्री तिला फोन कुठे ठेवला ते आठवेना आणि अचानक तिची नजर टेबलावरच्या डायरीकडे गेली. ही तीच डायरी होती जी कालपर्यंत हरवली होती. ओवीला नीट आठवत होते की आदल्या दिवसापर्यंत ती डायरी तिथे नव्हती. ओवीच्या हातापायातले त्राणच गेले होते. कसबस बळ एकवटून ती टेबलापर्यंत गेली आणि तिने डायरी उचलली. स्पायरल बायडिंग केलेल्या डायरीचे मुखपृष्ठ आणि मलपृष्ठ सारखेच होते. त्यामुळे कोणत्याही बाजूने लिहिता येण्याजोगे होते.

ओवीने डायरी उघडली आणि स्वत:चं अक्षर तिने ओळखल. तिला हृदयाची धडधड स्पष्ट ऐकू येऊ लागली, श्वासोच्छ्वासही जलद झाल्याचे तिला जाणवले. डायरीमध्ये लिहिलेला मजकूर असा होता.

*'राधिका पंडित माझी बालमैत्रीण तिच्याशी माझे उत्तम जमते. कुरळ्या केसांची, बोलक्या डोळ्यांची राधिका*

म्हणजे एक चालती बोलती बाहुलीच आहे. म्हणूनच तर माझ्या साहिल दादाने तिला पसंत केली. त्यांची जोडी किती छान दिसते. माझ्या मनातल्या सर्व गोष्टी मी राधाशी शेअर करते. ती माझी बहिणच आहे. मित्रबद्दल मला जे वाटते ते मी तिला सांगितले आहे. आज कोणत्यातरी हॉस्पिटलमध्ये आले आहे. केवढा प्रशस्त दवाखाना आहे हा. हो सौमित्र देखील आहे. डॉक्टरच्या पोशाखात तो अधिकच राजबिंडा दिसतोय. पण इथे आई-बाबा कसे? सार्थक सुद्धा आला आहे. आई-बाबा परत आले का? देवाने त्यांना परत पाठवलं का? असे नाना विचार माझ्या मनात पिंगा घालत आहेत. मित्र कुठे दिसत नाही. अचानक आई-बाबा आणि सार्थक रडायला लागले. कोणालातरी स्ट्रेचरवरून आय. सी. यु मध्ये नेले. ती मुलगी मला राधीकासारखी वाटतेय. कदाचित भास असेल. आय. सि. यु. चं दार बंद झालंय आणि लाल दिवा लागला आहे. किती तरी वेळ मी बाहेरच बसले आहे. आई-बाबा, सार्थक सुद्धा पुतळ्यासारखे निश्चल आहेत. ते कसलीतरी वाट बघत आहेत. किती तास गेले की दिवस गेले मला समजत नाही. वेळ हा कापरा सारखा उडून जातोय. मलाही माझा पुतळा झाल्यासारखं वाटतं आहे. शेवटी एकदाची लाल लाईट बंद झाली. दरवाजा उघडला. आईने भकास

*नजरेने माझ्याकडे पाहिले. मला आत जायची खुण केली. मी आत आले. खोलीत केवळ बेडवर झोपलेली राधिका. निश्चल राधिका. तिच्या चेहऱ्यावर अनेक जखमा झालेल्या आहेत. मी तिच्या जवळ गेले. परंतु ती गाढ झोपलेली होती. तेव्हड्यात कोणीतरी डॉक्टर आले आणि त्यांनी तिच्या अंगावर पंढरी चादर टाकली. याचा अर्थ राधिका देवाघरी गेली? आई-बाबा आणि सार्थक सारखी? '*

ओवीच्या हातातून डायरी गळून खाली पडली. ती तशीच मटकन खाली बसली. तिला कसलाच अर्थबोध होत नव्हता. हे एक स्वप्न तर नसेल? इतक्यात तिचा फोन वाजायला लागला. बऱ्याच वेळाने तिच्या ते लक्षात आले. तिने पहिले तर फोन सौमित्रचा होता. ओवीच्या पोटात खड्डा पडला. कोरड्या ओठावरून तिने जीभ फिरवली. हॅलो म्हणण्याआधीच सौमित्रचा घाबरलेला आवाज आला.

"हॅलो ओवी, राधिकाचा मेजर ॲक्सिडेंट झाला आहे. तिला मंगेशकर हॉस्पिटल मध्ये आणलं आहे. मावशीला सांग. साहीलला मी फोन केलेला आहे, " "

"मला माहित आहे, " सुन्नपणे ओवी म्हणाली. सौमित्र गोंधळला.

“हे बघ घाबरू नकोस, सगळं नीट होईल, ” त्याला वाटले शोकामुळे ओवीला असं वाटत असेल.

“तू ठीक आहेस ना? ” त्याने काळजीने विचारले. “मला माहित आहे आणि माझ्यामुळेच सर्व झालं आहे, ” स्वगत बोलल्यासारखी ओवी पुटपुटली. तिने फोन नुसता खाली ठेवला. सौमित्र “हॅलो हॅलो” करतच राहिला कितीतरी वेळ.

समोरून ओवीचा कसलाच प्रतिसाद नव्हता. काय झालं असेल? सौमित्रला काळजी वाटली. साहिल आला होता. सौमित्रने त्याला धीर दिला.

“काय झालं मित्र? ”

“सिग्नलला ॲक्सिडेंट झाला. ती रिक्षातून उतरत होती. तिला खुप लागलं आहे. हे बघ साहिल सावर स्वत:ला. तिचे आई-बाबा घाबरून गेले आहेत. तू गळून गेलास तर कसं होईल? मावशीला सांगितलं का? ”

“नाही तुझा फोन आला आणि मी तसाच निघालो. तुला कसं समजलं?”

“माझा मित्र सर्जन आहे इथे. त्याची कार मागेच होती. त्याने यांना इथे आणल. मी सहजच त्याला भेटायला आलो होतो तेव्हा समजलं. ”

“खुप लागलं आहे का? खरं सांग प्लीज. आय. सी. यु. मध्ये आहे ती, ” साहिल गदगदत म्हणाला. सौमित्रने होकारार्थी मान डोलावली. तोपर्यंत मावशी-काका आले होते. मावशीने राधिकाच्या आईला सावरल. परंतु त्या खूपच रडत होत्या. सौमित्रची नजर ओवीला शोधत होती. त्याने थोड्या-वेळाने मावशीला बाजूला नेलं आणि ओवीबद्दल विचारल. “ती केव्हाच ॲक्टिव्हावरून बाहेर पडली.

मला काहीच बोलली नाही. मला वाटलं इथेच आली असेल. ” आता सौमित्रला ओवीची काळजी वाटायला लागली. परंतु त्याला तिथून बाहेर पडता येत नव्हत. त्याही परिस्थितीत साहिल त्याच्याकडे आला आणि म्हणाला,

“ओवी कुठे आहे? जा तिला बघ. आम्ही आहोत इथे, ” सौमित्र पडत्या फळाची आज्ञा घेवून बाहेर पडता पडता म्हणाला, “मला कळव काहीही लागलं तर. इथे कसलीच गरज भासणार नाही. मी बोलून ठेवलं आहे, ” त्याने साहीलला मिठी मारली आणि निघाला. आता त्याच्या नजरेसमोर फक्त ओवी होती. ओवी त्याचा फोन उचलत नव्हती. सौमित्र सर्वप्रथम साहिलच्या घरी आला. दरवाजा उघडाच होता आणि घरात कोणीही नव्हत. ओवी कुठे गेली असावी याचा काहीच अंदाज लागत नव्हता.

आपण कुठे जात आहोत याचे ओवीला भानच नव्हते. यंत्रवत प्रवास चालला होता. घराला कुलूप न लावताच ती रस्त्यावर आली आणि कितीतरी वेळ तिला पुढची कृतीच सुचेना. अखेर समोर थांबलेल्या रिक्शावाल्यानेच विचारले. “मॅडम रिक्षा? ” आणि ती रिक्षेमध्ये बसली. “पुणे स्टेशन, ” आपल्याच नादात तिच्या ओठातून गेले होते. प्लॅटफॉर्मवर तिने कल्याणचे तिकीट काढले. ट्रेन सुरु झाली आणि विचारांनी बधीर झालेले डोक तिने सीटवर मागे झोकून दिलं. त्यातच तिचा डोळा लागला.

"कुठे गेली असेल ही? " सौमित्र स्वत:शीच पुटपुटला. ओवीचा फोन स्वीच ऑफ लागत असल्याने कसलाच अंदाज करता येत नव्हता. जिना चढून तो ओवीच्या खोलीत गेला. बेडवर तिचा नाईट गावून पडला होता. त्याने हलकेच तो उचलला. त्याच्या मुलायम स्पर्शाने त्याला ओवीची आठवण प्रकर्षाने जाणवली. तिच्याविषयी गेले कित्येक दिवस मनात दाटून आलेल्या विचारांचा गुंता त्याला सोडवता येईना. खरंतर आजवर अनेक मुली त्याच्या आयुष्यात येवून गेल्या होत्या. जेनि बरोबर तो अमेरिकेमध्ये दोन वर्ष लिव इन रिलेशनशिप मध्ये राहत होता. परंतु ओवीबद्दल ज्या भावना त्याला वाटत होत्या. त्या वेगळ्याच होत्या. आजवर कधीही न जाणवलेल्या! तिच्या काळजीने त्याचे डोळे पाणावले. हताश होवून तो बेडवर बसला आणि सर्वप्रथम त्याची नजर समोर असलेल्या मेजाकडे गेली. मेजावर असलेली डायरी ही उघडीच होती आणि खिडकीतून येणाऱ्या वाऱ्यावर तिची पाने फडफडत होती. सौमित्र हळूहळू चालत मेजाजवळ गेला आणि त्याने पानाची फडफड हाताने थांबवली. पाने एकामागोमाग एक मागे नेत अखेर त्याने पहिले पान उघडले. अक्षर अनोळखी होते. पण त्यामध्ये राधिकाचा उल्लेख आणि एकूणच मांडलेला प्रसंग ओळखीचा होता. आत्ताच घडलेल्या घटनांचे वर्णन केले होते. सौमित्रच्या लक्षात आले की लेखक हा दुसरा तिसरा कोणी नसून ओवी होती. परंतु घडलेल्या घटनेबद्दल कसलीही माहिती नसताना एवढ्या अचूक तिने कसे लिहिले असेल याचा त्याला अर्थबोध होईना. पुढची पाने रिकामीच होती. अचानक सौमित्रच्या हातातून डायरी निसटली आणि खाली पडली. त्याने वाकून ती उचलली. तेव्हा त्याच्या लक्षात आले की मागच्या बाजूने देखील काहीतरी लिहिले आहे. सौमित्र वाचू लागला. वाचता वाचता त्याच्या हृदयाचे ठोके जलद होवू लागले. गोष्ट वाचून झाल्यावर त्याच्या डोळयासमोर पूर्वी हॉटेलमध्ये त्याचे आणि ओवीचे झालेले संभाषण उभे राहिले. त्याच्या हृदयात धस्स झाले. विजेच्या धक्क्यासारखा तो चटकन उठला आणि डायरी घेवूनच घराबाहेर पडला. आता त्याला ओवीचा पत्ता सापडला होता आणि लवकरात लवकर तिच्यापर्यंत पोहचणे अनिवार्य होते.

आपण इथपर्यंत कसे येवून पोहोचलो याचे ओवीला भान नव्हते. आता पुढे काय वाढून ठेवले आहे याचाच ती विचार करत होती. गेटमधून आत जाताना तिचे पाय दगडाचे झाले होते. परंतु पुढे जाण्याशिवाय दुसरा पर्याय नव्हता. ओवीने एक आवंढा गिळला. प्रत्येक चाली बरोबर तिच्या हृदयाची धडधड वाढायला लागली. घरावर कसली तरी अवकळा आली होती. सर्वत्र भयाण शांतता होती. दरवाजा सताड उघडाच होता. ओवी दिवाणखान्यात आली. गेली दहा वर्ष परिचयाचा हा दिवाणखाना आता तिला अनोळखी वाटत होता. मामा-मामी कुठे दिसतात का याचा अंदाज घेत ती आतल्या खोलीत गेली. झोपण्याच्या पलंगावर कोणीतरी व्यक्ती निजली होती. पाठमोऱ्या व्यक्तीला ओवीने ओळखले. ती मामी होती. दुपारचे अकरा वाजले होते. यावेळेला मामी झोपणे शक्यच नसल्याने तिच्या मनातील शंका हळूहळू गडद होवू लागली. ती मामीला उठवणार इतक्यातच तिच्या खांद्यावर कोणाच्यातरी हाताचा स्पर्श झाला. मामाचा स्पर्श तिने ओळखला. परंतु त्याला पाहिल्यावर मात्र तिला धक्का बसला. तो कमालीचा खंगला होता. कोणत्यातरी मोठ्या आजारातून उठल्यासारखा. मामाच्या मागोमाग ती दिवाणखान्यात आली. “काय झालं मामा? सार्थक कुठे आहे? ” ओवीला आता हा ताण सहन होईना.

“त्याला किडनॅप केले आहे, ” अंकुश अभ्यंकर शून्यात पहात बोलले आणि त्या शब्दांनी ओवीच्या काळजाचा ठाव घेतला. ते स्वप्न, तिने लिहिलेली घटना तिला सर्व सांगून गेले.

“हे कधी घडलं? ” कापऱ्या आवाजात तिने विचारले.

“आठवडा झाला असेल. पोलिसात कळवलं तर त्याचा जीव घेणार ते. आमच्या घरावर त्यांचं लक्ष आहे, ” मामा स्वत:शीच पुटपुटत होते.

“काय हवं आहे त्यांना? ” ओवीने उद्वेगाने विचारले.

“एका बड्या उद्योगपतींच्या घरावर मागच्या आठवड्यात आमची रेड पडली होती. त्यांना क्लीन चीट द्यायला हवी आहे, ” अंकुश अभ्यंकर हे एका अँटी करप्शन ब्युरो मध्ये मोठ्या हुद्यावर कामाला होते. आयुष्यभर अत्यंत प्रामाणिकपणे त्यांनी नोकरी केली होती. मोहाचे अनेक प्रसंग त्यांनी पाहिलेले होते. परंतु पहाडासारखे असलेले अंकुश आज मुलाच्या काळजीने कासावीस झाले होते. एकीकडे त्यांची तत्व, नोकरी, एका करप्ट माणसाला क्लीन चीट दिल्यानंतर होवू शकणारी एनक्वायरी, नाचक्की, कदाचित सस्पेन्शन देखील आणि दुसरीकडे स्वत:पेक्षाही जास्त प्रेम असलेला त्यांचा मुलगा, त्यांचा श्वास होता.

“तुझी मामी म्हणजे जिवंत मढं आहे. ओवी मी हरलोय गं. माझ्या प्रामाणिक पणाने माझा घात केला, ” मामा गदगदत म्हणाले.

“मी तुमचा घात केलाय, मामा, ” ओवी पुटपुटली.

“मी तुम्हाला शब्द देते मामा, मी सार्थकला परत आणीन, ” ओवी कसल्यातरी निर्धाराने उठत म्हणाली.

“जुन्या घराची चावी हवी आहे. ”

“कशासाठी? ओवी म्हणूनच मी तुला कसलीच कल्पना दिली नव्हती. तू काय करणार आहेस? ” मामांनी धास्तावून विचारले.

“खात्री. मामा माझ्या मनातल्या प्रश्नांच्या उत्तराची एकदा खात्री करावयाची आहे. ती माझ्या जुन्या घरात आहे. प्लीज मला काही विचारू नका, ”

ओवीने हात जोडले. “मामा काही न बोलता आतमध्ये गेले आणि त्यांनी कील्ली आणून ओवीला दिली. ओवी काही न बोलता घराबाहेर पडली.

गेली कित्येक वर्ष ओवीसाठी तिचे घर बंद होते. दोनच खोल्यांचं ते लहानस घर होते. ओवीचे वडील खाजगी कंपनीत कामाला होते. तिच्या आजोबांच्या कल्याणमध्ये दोन खोल्या होत्या. तेवढीच काय ती त्यांची संपत्ती होती. परंतु ते समाधानी होते. आई-वडील गेल्यानंतर त्यांची आठवण म्हणून ओवीच्या मामांनी ते घर तसेच ठेवले होते. ऐन वस्तीतल्या त्या दोन खोल्यांची किंमत आज लाखोंच्या घरात पोचली होती. परंतु त्यापेक्षा जास्त महत्वाची ओवीची तिथली भावनिक गुंतवणूक होती. काही दिवसांनी मामा स्वत: त्या घराची साफसफाई करण्यासाठी जात. परंतु ओवी मात्र दुरूनच डोळे भरून ते घर पाहत असे. प्रत्येक रविवारी ती आपल्या घराचे हे असे दर्शन घेत असे आणि या गोष्टीची कल्पना असलेल्यां तिच्या मामांनी ते घर विकले नव्हते.

जसजसं घर जवळ यायला लागलं तसतशी तिची स्पंदनं, नाडीचे ठोके वाढायला लागले. मानेला झटका देत तिने मनातले विचार उधळून लावले. सोक्षमोक्ष लावणे आता अगदीच गरजेचे होते. उंबरठा ओलांडून ग्रीलचे दार तिने उघडले आणि ती घरात गेली. हॉलचा दरवाजा थोडासा करकरतच उघडला आणि समोरच पोटमाळा दिसला. कोपऱ्यामध्ये वास्तुपुरुषाला लावलेला दिवा आणि अगरबत्ती आता विझली होती. घर तसे स्वच्छ होते. मोजकंच असलेले साहित्य पोटमाळयावर मांडून ठेवले होते. पोटमाळयाला एक शिडी लावलेली होती. पाय घट्ट रोवत ओवी त्यावर चढली. भांडी आणि इतर साहित्य पोटमाळयामध्ये व्यवस्थित बांधून ठेवले होते. दोन-तीन पोती उघडून बघितल्यावर तिला हवी असलेली गोष्ट सापडली नाही आणि अचानक तिचे लक्ष तिच्या दप्तराकडे गेले. इयत्ता चौथी-पाचवीतलं तिचं ते दप्तर स्वत:मध्ये अनेकविध वह्या-पुस्तके सामावून घेवून बंद झालेले होते. तिचे डोळे चमकले. उघडलेल्या दप्तरामधून भिरभिरलेल्या

तिच्या नजरेला हवं ते सापडलं होतं. थरथरत्या हातानेच तिने ती डायरी उघडली. मोठ्या टपोऱ्या अक्षरामध्ये लिहिलेली गोष्ट ती वाचू लागली.

*‘मी ओवी दिनकर साठे, आई-बाबांची एकुलती एक कन्या! खरंतर देवाने एकतरी भावंड मला द्यायला हवं होतं. तेही लहान, आई-बाबा तरी कुठे रहाणार आहेत माझ्याबरोबर? उद्या आईचा वाढदिवस म्हणून बाबा तिला घेवून देवदर्शनाला जाणार आहेत. प्रमोदकाकांनी त्यांना कार दिली आहे. बरेच दिवस बाबांनी चारचाकी चालवली नाही. आईने त्यांना सांगितले होते की, आपण एस. टी. ने जावू. पण बाबांनी आपला हेका सोडला नाही. गुरुजींनी शिकविलेली म्हण आठवली. विनाशकाले विपरीत बुद्धी| उद्या गाडीला होणाऱ्या अपघातात आई-बाबा मला सोडून कायमचे देवाघरी निघून जातील. ’*

पानभर लिहिलेली ती कथा वाचून झाल्यावर ओवीच्या डोळयासमोर अंधारी आली. शेवटी तिचे पाय लटपटले आणि तिचा तोल गेला. शेवटच्या क्षणी तिला कोणाचीतरी आर्त स्वरात मारलेली हाक ऐकू आली. परंतु आता तिची शुद्ध हरपली होती.

साहिलकडून सौमित्रने ओवीच्या मामांचा पत्ता घेतला होता. मात्र बाकी कसल्याच गोष्टींचा थांगपत्ता लागू दिला नव्हता. परंतु साहीलला संशय आल्याची त्याला खात्री होती आणि त्याचाही नाईलाज होता. ओवीच्या मामांकडे पोहोचल्यावर त्याला समजलं की सार्थक म्हणजे ओवीचा भाऊ बेपत्ता आहे. ओवीने लिहिलेल्या कथेप्रमाणेच घडलं होतं. थोडक्यात त्याची आणि ओवीची चुकामुक झाली होती. तिच्या मामांकडून तिच्या घरचा पत्ता घेवून तो निघाला. वाटेत ओवी कदाचित सापडेल असं त्याला वाटलं होतं. अखेर घराजवळ पोहोचल्यावर घराचा उघडा दरवाजा बघून ओवी आतमध्ये असल्याची खात्री झाली आणि त्याचा जीव भांड्यात पडला. तिला भेटण्यासाठी तो अधीर झाला होता. तिला सुखरूप असलेले पाहूनच त्याचं समाधान होणार होतं. झटक्यात रस्त्यावरच कार उभी करून तो जवळ जवळ धावतच घरात शिरला आणि शिडीवरून पाय निसटणाऱ्या ओवीला पाहून त्याच्या काळजात धस्स झाले. लगबगीने पुढे होत त्याने निर्वाणीची हाक मारली आणि आपल्या मजबूत हातांनी तिला सावरल.

शुद्ध हरपलेल्या ओवीला सर्वप्रथम भानावर आणण गरजेचे होते. तिथेच एका बाजूला तिला झोपवून सौमित्रने कार मधली पाण्याची बाटली आणली आणि तिच्या चेहऱ्यावर पाण्याचे थेंब शिंपडले. थंडगार पाण्याच्या स्पर्शाने हळूहळू ओवीने डोळे उघडले. परंतु समोर सौमित्रला पाहून तिला धक्का बसला.

“थोडं पाणी पी, तुला बरं वाटेल, ” तिच्यासमोर पाण्याची बाटली धरत सौमित्र मायेने म्हणाला. पाणी पिल्यावर ओवीला जरा बरे वाटले. सौमित्रपासून शक्य तितक्या दूर भिंतीला टेकून ती बसली.

“तू इथे कसा? ”

“ओवी मी इथे येण्यापूर्वी तुझ्या मामांच्या घरी गेलो होतो, ” त्याच्या उत्तराने ओवीच्या कपाळावरच्या आठ्या वाढल्या.

“ओ. के. मी तुझी डायरी आणि त्यात तु लिहिलेल्या दोन्ही कथा वाचल्या आहेत. सार्थकला शोधत तू मामांकडे जाशील याची मला खात्री होती, ” आपण केलेला गुन्हा समोरच्याला समजावा आणि आपल्यावर गुन्हेगारीचा शिक्का बसावा अशी ओवीच्या मनाची स्थिती झाली. तिचा पडलेला चेहरा पाहून सौमित्रला ते समजले.

“हे तू लिहिल्यामुळे घडलं असेल असं मला वाटत नाही. ओवी तू मला यापूर्वी याबद्दल सांगितलं होतंस. प्लीज बोल ना!” तिला गप्प बसलेलं पाहून सौमित्रचा जीव कासावीस झाला. तो तिच्या जवळ गेला. त्याने तिचा हात हातात

घेतला. परंतु ओवीने पाल झटकावी तसा तो झटकून दिला आणि ती त्याच्यापासून दूर झाली.

“सौमित्र प्लीज, माझ्या अत्यंत जवळच्या व्यक्तींचा मी खुन केला आहे आधी माझे आई-बाबा, आणि आता सार्थक, राधिका. ”

“आई-बाबा म्हणजे? मी समजलो नाही. ”

ओवीने हातात धरलेली जुनी डायरी त्याला दिली. ती गोष्ट वाचल्यावर त्यालाही धक्का बसला.

“ओवी, हे असं का घडलं याचं तुला मी याक्षणी उत्तर देवू शकत नाही. मला थोडा विचार करावा लागेल. आपण आत्ता इथून बाहेर पडूया. तुझे मामा तुझी काळजी करत बसले आहेत, ” ओवीलादेखील ते पटले. ती निमुटपणे सौमित्र बरोबर कारमध्ये बसली.

“राधिका कशी आहे? ” तिने केवळ एकच प्रश्न विचारला. परंतु सौमित्रने यावर केवळ “बरी आहे” एवढं मोघम उत्तर दिलं. थोड्या वेळापूर्वीच त्याला साहिलचा फोन आला होता, राधिका कोमामध्ये गेली होती.

ओवीला तिच्या मामांकडे सोडून, सौमित्र लगेचच निघाला. ओवीने लिहिलेल्या तिन्ही कथा त्याने सोबत घेतल्या. आज त्याचं मन भरकटलं होतं. सकाळपासून घडलेल्या प्रत्येक घटनेचा तो विचार करत होता. आजवर प्रत्येक गोष्टींचा वैज्ञानिक दृष्टीकोनातून विचार करावयाची त्याला सवय लागली होती. याक्षणी त्या कोड्याचं उत्तर देणारी एकच व्यक्ती त्याला दिसत होती आणि ती म्हणजे डॉ. विश्वास!

बंगल्याच्या फाटकात उभ्या असलेल्या वॉचमनला सौमित्रने आपले नाव सांगितले. त्याने गेटवरून बंगल्यात फोन लावला आणि सौमित्र आल्याची वर्दी दिली. सौमित्रला लगेचच आतमध्ये सोडण्यात आले. बंगल्यासमोर हिरवेगार लॉन पसरले होते. बागेमध्ये अनेक प्रकारची फुलझाडे लावलेली होती. करंज्यांमुळे वातावरणाला शोभा आली होती. कार पार्क करून सौमित्र उतरला. बंगल्यात प्रवेश करण्यापूर्वी हात-पाय धुण्यासाठी पाण्याची सोय केली होती. सौमित्र यापूर्वी देखील आला होता त्यामुळे त्याला माहित होते.

दिवाणखान्यात एका कोचावर तो स्वस्थ बसला. नोकराने त्याला वाळयाचे सरबत आणि वाफाळलेली कटलेट्स आणून दिली. सकाळपासून काहीच न खाल्याचे त्याच्या लक्षात आले. चवदार कटलेट्स आणि सरबत पिल्यावर त्याला तरतरी आली. डॉ. विश्वास यांनी आतमध्ये बोलावल्याचा नोकराने निरोप दिला. तसा सौमित्र भव्य संगमरवरी जिन्याच्या पायऱ्या चढून वर आला. आता वातावरणामधली शांतता त्याला कमालीची जाणवली. मंदिरात गेल्यावर जसं शांत आणि पवित्र वाटतं अगदी तसेच भाव त्याच्या मनात दाटून आले. डॉ. विश्वास काहीतरी वाचत बसले होते. सौमित्र त्यांच्या समोरच्या सोफ्यात बसला. थोड्यावेळाने डॉ. विश्वास यांनी आपला हाफ फ्रेमचा चष्मा बाजूला ठेवला.

“बोल सौमित्र, ” एवढंच ते म्हणाले. सौमित्रने प्रत्येक बारीक-सारीक मुद्दे लक्षात ठेवून सर्व घटनेचे वर्णन केले. डॉ. विश्वास यांनी सर्व शांतपणे ऐकून घेतले.

“ओवीने लिहिलेल्या कथा आहेत? ” सौमित्रने मान डोलावली आणि त्या कथा त्यांना दिल्या. सर्व नीट वाचल्यावर ते सौमित्रला म्हणाले,

“तू अचेतन मनाबद्दल नक्कीच वाचलं असणार. परंतु तरीही मी तुला काहीच माहित नाही असं समजून सर्वकाही सांगतो. मनाचे दोन स्तर असतात. चेतन किंवा तार्किक स्तर आणि अचेतन किंवा अतार्किक स्तर. अचेतन मन म्हणजे

दिव्य सर्वगुण संपन्न अशी शक्ती जी आपल्या भावनांचे ठिकाण आणि स्मृतींचे भांडार असते. आता या स्मृती अनेक जन्माच्या असतात. म्हणून बघ कित्येकदा आपण वाचतो की पोरसवदा वयातच एखाद्या मुलाने अनाकलनीय विद्या संपन्न केली किंवा एखाद्या कलेमध्ये प्राविण्य मिळवलं. आपल्याला खुप आश्चर्य वाटते. परंतु त्या आत्म्याच्या पूर्वजन्मीच्या संस्कारांच्या स्मृतीचे ते पडसाद असतात.

ओवीच्या बाबतीत मी असं म्हणेन की तिने लिहिलेल्या कथा सत्य होतात असे नसून तो पुर्वाभास आहे. इंग्रजीमध्ये त्याला प्रिमॉनिशन म्हणतात. भविष्याबद्दल काही घटनांचे अगोदरच ज्ञान होणे. अर्थात तिच्याबाबतीत ही क्रिया अचेतन पातळीवर होते. त्यामुळे तिला वस्तुनिष्ठ स्तरावर याचे ज्ञान नसते. ”

सौमित्र ऐकत होता. त्याला सत्य परिस्थितीची जाणीव झाली होती.

“परंतु या सगळयाचा तिच्या मनावर खुप परिणाम होतो आहे. राधिका, सार्थक यांना तिच्या मुळेच त्रास होतो आहे, असे तिला वाटते. राधिका कोमामध्ये गेली आहे. सार्थक सापडेल अशी कोणतीच शक्यता सध्यातरी दिसत नाही. या दोघांच्या जीवाला काही बरं-वाईट झालं तर ओवी स्वत:ला कधीच माफ करू शकणार नाही. ” सौमित्र अगदी मनापासून म्हणाला.

“सौमित्र अरे एखाद्या भविष्यामधल्या गोष्टीचा अगोदर पुर्वबोध होणे म्हणजे काही भयंकर गोष्ट नसून ही एक देणगी आहे. आपल्याला पडलेल्या सर्व समस्यांचे समाधान अचेतन मनामध्ये दडलेले असते. तू ओवीला माझ्याकडे घेवून ये,” सौमित्रने होकारार्थी मान डोलावली आणि तो निघाला. सकाळपासून त्याची खुप दगदग झाली होती. दादरला त्याचा स्वत:चा फ्लॅट असल्याने तिथेच जायचे त्याने ठरवले. तेवढ्यात त्याला ओवीच्या मामांचा फोन आला.

"सौमित्र, तुम्ही कुठे आहात? घरीच या मी तुमची जेवणासाठी वाट पाहतो आहे. "

"ठीक आहे, " सौमित्रला ओवीला भेटण्याची ओढ लागली होती, तो निघाला.

आता सार्थकला इथे येवून अनेक दिवस झाले होते. सकाळ-संध्याकाळ त्याला जेवण मिळत होते. प्रातर्विधीसाठी बाहेर जाताना मात्र डोळयांवर पट्टी बांधली जात होती. संपूर्ण खोलीत एकच खिडकी होती. जी खूपच उंचावर होती. त्यातून दिसत असलेल्या आभाळाच्या रंगावरून सार्थक वेळेचा अंदाज घेत होता. त्याला शेवटचा आठवत होता तो कारमधून केलेला प्रवास. त्यानंतर त्याची शुद्ध हरपलेली होती आणि जेव्हा जाग आली तेव्हा तो इथे होता.

आपल्याला पळविण्यात आल्याचे त्याला समजले होते. परंतु त्याचे कारण अज्ञात होते. आपण नाहीसे झाल्याचे लक्षात आल्यावर आई-बाबांची काय अवस्था झाली असेल या विचारातच पहिले अनेक दिवस रडून काढले. परंतु आता इथून बाहेर पडणे एवढे एकच लक्ष्य त्याला दिसत होते. गेले दोन-तीन दिवस तो दाराला कान लावून बाहेरची प्रत्येक हालचाल ऐकण्याचा प्रयत्न करत होता. बाहेर एकूण दोन माणसे त्याच्यावर पहारा ठेवून होती. परंतु त्यांच्या संभाषणावरून त्यांना बाकीचे काहीच माहित नसल्याचे समजत होते. संध्याकाळची वेळ होती. गेल्या काही दिवसांप्रमाणेच आजही दरवाजा उघडला गेला. काळा कभिन्न माणूस हातात

दोरी आणि कापडी पट्टी घेवून आला. त्याने सार्थकचे डोळे बांधले आणि दोरीने हात मागे बांधून टाकले.

“जल्दी चलो, ” तोंडातल्या तोंडात बरळत तो सार्थकला बाहेर घेवून आला. एका बाजूला असलेल्या संडासच्या खोलीत त्याला ढकलले आणि बाहेरून कडी लावली. सार्थकने अंदाजानेच आपला विधी आटपला. परंतु अचानक त्याच्या चेहऱ्यावर हवेची झुळूक आली. म्हणजे या खोलीला खिडकी होती. हात मागे बांधले असल्याने आणि डोळयांवर पट्टी असल्याने तो पूर्णत: असमर्थ होता. तरीही जिथून झुळूक येत होती त्या दिशेला त्याने डोळयानेच चाचपडले. परंतु त्याला खिडकीचा अंदाज येईना. तेवढ्यात बाहेर दार वाजले आणि सार्थकला थोड्या निराशेनेच बाहेर यावे लागले.

साहिल एकटक राधीकाकडे काचेमधून पहात होता. कोमामध्ये जावून दोन दिवस झाले होते. तिच्याकडून कसलाच प्रतिसाद नव्हता. साहिलच्या मनातल्या राधीकाबरोबर व्यतीत केलेल्या गोड आठवणी ताज्या झाल्या.

राधिका एक अत्यंत लाघवी मुलगी होती. साहीलला रेल्वे स्टेशनवरची त्यांची पहिली भेट आठवली. त्याचवेळी त्याच्या मनात ती भरली होती. परंतु त्याला ते आकर्षण वाटले होते. आज जर ती व्यवस्थित असती तर एव्हाना त्यांचा साखरपुडा झाला असता. आता सगळयाच जर-तरच्या गोष्टी होत्या. राधीकावरची नजर मोठ्या कष्टाने काढून साहिल जड पावलांनी हॉस्पिटलबाहेर आला. प्रवेशद्वारावरच्या गणपतीच्या भव्य मूर्तीकडे त्याचे लक्ष गेले. आजवर त्याने कधीही

देवाला नमस्कार केला नव्हता. आईला पूजा-अर्चा करताना पाहून तो तिचि मस्करी करत असे. प्रत्येक गोष्ट स्वकर्तृत्वावर मिळवल्याने देव या संकल्पनेवर त्याचा विश्वास नव्हता. अशक्यप्राय अशी कोणतीच गोष्ट त्याला माहीत नव्हती. त्या गजाननाच्या भव्य मूर्तीकडे पाहून त्याच्या मनात असंख्य विचारांचे वादळ उठले. दु:खाचे कढ दाटून आले. डोळयामधून सरीवर सरी ओघळू लागल्या. हात आपसूकच जोडले गेले आणि त्याने त्या विघ्नहर्त्यासमोर आयुष्यात पहिल्यांदाच दंडवत घातले. “माझ्या राधिकेला बरं कर, ” कसेबसे शब्द तो बोलून गेला.

दुरून हे सर्व पाहणाऱ्या त्याच्या आईने डोळयांना पदर लावला आणि साश्रू नयनांनीच त्या मनोमन नतमस्तक झाल्या.

ओवीने मामीला हाताला धरून डायनिंग टेबलवर आणून बसवलं. लहान मुलाला जसे चिऊ-काऊच्या गोष्टी सांगून भरवतात तसे भरवले. नंतर तिच्या खोलीत नेऊन झोपवले. सौमित्र सारे पहात होता. मामांच्या चेहऱ्यावरची हतबलता त्याला जाणवली. तिघेही एकत्र जेवायला बसले. कोणीच कोणाशी बोलत नव्हते. मामा तर पाण्याच्या घोटाबरोबर घास गिळत होते. अखेर सौमित्रनेच बोलायला सुरवात केली.

“माझा एक मित्र आहे. सी. आय. डी. मध्ये मोठ्या पदावर कार्यरत आहे. असं हातावर हात घेवून शांत रहाण्यात काहीच अर्थ नाही. तो सार्थकला नक्कीच

शोधून काढेल. मला खात्री वाटते. तुमची हरकत नसेल तर मी त्याच्याशी बोलू का? ”

मामांनी खुपवेळ सौमित्रच्या डोळ्यामध्ये पाहिलं. अखेर ओवीने त्यांच्या खांद्यावर हात ठेवला. त्या स्पर्शाने त्यांच्या मनातलं द्वंद्व संपलं आणि त्यांनी होकार दिला.

जेवून झाल्यानंतर मामांनी सौमित्रला विश्रांतीसाठी सार्थकची खोली दिली आणि ते झोपायला निघून गेले. खोलीत सार्थक आणि ओवीचा फोटो लावलेला होता. सार्थकला मिळालेली विविध पारितोषिके पाहून त्याच्या कुशाग्र बुद्धीचे सौमित्रला कौतुक वाटले. त्याच्या खोलीच्या बाजूलाच ओवीची खोली होती. सौमित्र खोलीत डोकावला. एका प्रशस्त खिडकीसमोर ओवी शून्यात नजर लावून कसल्यातरी विचारात बुडली होती. ती एकटी असताना आत जाणे त्याला प्रशस्त वाटेना. म्हणून दारातूनच त्याने तिला हाक मारली. तिने चमकून मागे बघितले.

“मला तुझ्याशी काही बोलायचे आहे. आपण बाहेरच बसुया का? ” दोघही दिवाणखान्यात आली. कोचावर ओवीसमोर बसत सौमित्रने बोलायला प्रारंभ केला.

“आज मी डॉ. विश्वासांकडे गेलो होतो. ते एक प्रख्यात मानसोपचारतज्ञ आहेत. या केसमध्ये मी त्यांच्याशी बोललोय. ओवी, तुझ्या त्या लिखाणाबद्दल बोलतोय मी. ”

“डॉ. काय म्हणाले? ” ओवीला सौमित्र असे काही करेल असे वाटले नव्हते.

“तुला जसं वाटतंय त्याच्या एकदम उलट घडलय, ” सौमित्र ठामपणे म्हणाला.

“म्हणजे मी समजले नाही. , ”

“तुला पुर्वाभास होतोय ओवी, ” ओवीच्या प्रश्नार्थक नजरेवरून सौमित्रच्या लक्षात आलं की तिला हा शब्द नवीन आहे. म्हणून त्याने तिला सर्व समजावले. या सगळयाचा ओवीने विचारच केला नव्हता. सौमित्रचे बोलणे पूर्ण झाल्यानंतर ओवी म्हणाली,

“मला डॉ. विश्वासना भेटावयाचे आहे, ” सौमित्रने तिला त्यांचा पत्ता दिला आणि तो म्हणाला

“मी किरणशी बोललो आहे, माझा सी. आय. डी. मधला मित्र, तो इथेच येतोय मग सविस्तर बोलू असं म्हणाला आहे, ” परतू ओवीचे लक्षच नव्हते. ती हातातल्या व्हिजिटिंग कार्डकडे पहात होती. कसलातरी विचार करून ती उठली आणि तिने खोलीत जावून आपली पर्स आणली.

“तू मामांजवळ थांबशील प्लीज? मी डॉ. विश्वासना भेटून येते आणि मामांना याबद्दल काही सांगू नकोस, ” तिच्या दमलेल्या चेहऱ्याकडे पाहून सौमित्रला वाटलं तिला विश्रांतीची खुप गरज आहे. परंतु त्याला माहित होतं की तिच्या मनातले अनेक प्रश्न तिला झोपू देणार नव्हते.

“जाताना तुझे कपडे घेवून जा. कदाचित तुला त्यांच्याकडे रहावे लागेल, ” तो कसंतरी बोलून गेला. ओवी काही न बोलता खोलीत गेली, मिळेल ते कपडे बॅगेत

थांबले आणि ती बाहेर आली. येताना तिने मामा-मामींच्या पायाला हात लावून नमस्कार केला.

“मी येईपर्यंत प्लीज तू इथेच थांब, एवढं  करशील ना? ” ओवीचे डोळे भरून आले. सौमित्रच्या भावना अनावर झाल्या. त्याने तिला आवेगाने मिठी मारली आणि तिच्या गालावर अलगद ओठ टेकवले.

“काळजी घे. मी तुझी इथेच वाट पाहीन, ” तिच्या कानात तो पुटपुटला.

“येते, ” त्याच्यापासून दुर होत ओवी कोरडेपणाने म्हणाली आणि निघून गेली. सौमित्र मात्र तिच्या पाठमोऱ्या आकृतीकडे पहात राहिला, कितीतरीवेळ.

डॉ. विश्वासना भेटल्यावर ओवीला मनापासून बरं वाटलं. परंतु तिच्या मनात अनेक प्रश्न होते.

“हे माझ्याच बाबतीत का होतं? मी कधीही कोणतीही विद्या शिकले नाही! हे सर्व लिहित असताना मला कशाचं  भान का नसत? माझ्या ज्या व्यक्ती सर्वात जवळच्या आहेत त्यांच्याच बाबतीत हे घडतय. सार्थकचा अजूनही पत्ता नाही. मी लिहिल्याप्रमाणे तो आई-बाबांबरोबर निघून जात होता, याचा अर्थ काय? मी पाहिलेल्या स्वप्नात राधिकाचा देहांत झाला होता. मी काय करू डॉ. ! प्लीज सांगा, ” ओवी रडू लागली.

तिच्या डोक्यावर मायेने थोपटत डॉ. विश्वास म्हणाले,

“मृत्यू हे एक शाश्वत सत्य आहे. आत्म्याच्या क्रमानुसार त्याच्या मृत्यूची तारीख अगोदरच ठरलेली असते. इतर सर्व घटना, व्यक्ती केवळ निमित्तमात्र असतात. तुझ्या मनातल्या प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी मला संमोहन करावे लागेल. कदाचित पूर्वजन्मात काही कृती घडलेली असेल. तू तयार आहेस का? ” ओवीने मानेनेच संमती दिली.

एका अत्यंत शांत खोलीमध्ये डॉ. ओवीला घेवून गेले. तिथे असीम शांतता होती. एका आसनावर ओवीला बसायला सांगून विश्वास तिच्या समोर बसले. तिचं शरीर आणि मन त्यांच्या सूचनांनवर एकाग्र होवू लागलं आणि अवघ्या काहीच क्षणांमध्ये ती संमोहित झाली. आता फक्त डॉक्टरांच्या सूचना ऐकू येत होत्या. डोळे जड होवून मिटले गेले होते.

“या आधीच्या जन्मामध्ये मी आत्मा आप्पाभाऊ ज्योतिषी या नावाने अस्तित्वात होतो. ज्योतिष शास्त्रातले बारीक-सारीक बारकावे जाणून घेण्यामध्ये माझे उभे आयुष्य गेले. अचूक भविष्य सांगण्यामध्ये माझा हातखंडा होता. त्यामागे माझी प्रचंड साधना होती. एखादा आत्मा संपर्कात आला की त्याच्याकडून येणाऱ्या विचारलहरींमधून त्याचा स्वभाव, त्याच्यातील सात्विक वा तामसी वृत्ती याचे मला ज्ञान होऊ लागले. या आभासी दुनियेमध्ये घडत असलेल्या प्रत्येक गोष्टीची, उमटणाऱ्या पडसादांची मला पूर्वकल्पना येऊ लागली. जप, तप करून हळूहळू मी माझ्यातल्या शक्तीचा विकास केला. स्वप्नदृष्टांत ही माझी सर्वात जमेची बाजु होती. परंतु या विद्येमुळेच माझा नाश झाला. इतरांना मी चेटूक करणारा वाटू लागल्याने अखेर मला देहांत शिक्षा मिळाली, ” शांत पण जड आवाजात ओवीने पूर्वजन्माचे

र्णन केले. डॉ. विश्वास यांनी विचारलेल्या प्रश्नांचे तिच्या उत्तरांतून समाधान झाले होते.

"मी डॉ. विश्वास आता जे काही सांगणार आहे त्याचे तू व्यवहारामध्ये १००% आचरण करणार आहेस. तुला होत असलेल्या पुर्वाभासांबद्दलची भीती तुझ्या मनामधून पूर्णपणे नाहीशी झाली आहे. प्रत्येक दिवशी तुला अधिकाधिक आनंदी आणि उत्साही वाटतं आहे. तुझी लेखणी सर्व रसांनी संपृक्त झालेली आहे. तुला होत असलेले पुर्वाभास केवळ स्वप्नदृष्टांतापुरतेच मर्यादित राहिलेले असून ते दिवसागणिक कमी कमी होत आहेत. तुझा आत्मविश्वास पूर्वीपेक्षा अनेक पटींनी वाढला आहे. आता मी १ ते ५ आकड्यांचा उच्चार करीन आणि पाचव्या आकड्याला तू संमोहनाच्या अवस्थेतून बाहेर पडशील. १, २, ३, ४, ५...... "

ओवीने हळू हळू आपले डोळे उघडले. तिला अतिशय ताजेतवाने आणि उत्साही वाटत होते. डोक्यामध्ये विशेषतः दोन भुवयांच्या मधोमध अतिशय थंड वाटू लागले होते. जणू काही बर्फाळ पाणी तिच्या शरीरामध्ये झिरपत जाऊन सर्वत्र शीतलता निर्माण झाली होती.

"तू इथेच थोडावेळ पडून राहा. कदाचित तुला झोप लागेल, " डॉ. विश्वास यांचा आवाज त्या शांत वातावरणामध्ये घुमला. ओवी तशीच जवळच्या चटईवर झोपली. मिटलेल्या डोळयांपुढे अनेकविध रंगांचे कारंजे दिसत होते. तिचा श्वासोच्छवास संथपणे चालू होता. डोळयांवरच्या ग्लानीने शरीराचा ताबा घेतला आणि ती निद्रेच्या अधीन गेली.

रातकिड्यांचा किर्र आवाज येत होता. दाराबाहेरचे पहारेकरी देखील झोपलेले असावेत असे सार्थकला वाटले, कारण त्यांचे आपापसातील बोलणे खुंटले होते. तेवढ्यात दाराबाहेर चारचाकी थांबल्याचा आवाज आला. किती वाजले होते याचा काहीच अंदाज नसल्याने आणि येथे कोंड्ल्यापासून वाहन थांबल्याचा प्रथमच आवाज आल्याने सार्थकला कमालीचे आश्चर्य वाटले. बाहेरच्या दोघांना अर्वाच्च शिव्या दिल्याचा स्वर ऐकू आला. पाठोपाठ चपराक बसल्याचा आवाज आला. सार्थकच्या सुकलेल्या आशा पल्लवित झाल्या.

धाडकन दरवाजा उघडला गेला. बॅटरीचा प्रकाशझोत खोलीभर फिरवत सार्थकवर स्थिरावला. डोळे दिपून गेल्याने त्याला काही दिसेना. बुटांचा आवाज जवळ जवळ आला आणि सप्प. . . . . अंगावर चांबडी पट्ट्याचा फटका बसला. तीव्र सणक डोक्यात गेली आणि त्यानंतर अनेक वेदनांनी त्याचे शरीर भरून गेले. खोलीभर त्याच्या ओरडण्याचा आणि रडण्याचा आवाज पसरला आणि अखेर त्याची शुद्ध हरपली.

चेहे्ऱ्यावर थंड पाण्याचा फवारा बसला आणि सार्थक खडबडून जागा झाला. सर्वांग अक्षरशः ठणकत होते. कोणाचेतरी उद्दाम बोल त्याच्या कानी पडले,

“तुझा बाप तयार नाही. तुझ्यापेक्षा त्याला त्याची तत्व जास्त प्रिय आहेत. त्याला २४ तासांची मुदत दिली आहे. तेव्हा प्रार्थना सुरु कर, तुझं जीवन मरण एका दिवसावर अवलंबून आहे, ” त्याच्या अंगावर तो पचकन थुंकला आणि निघून गेला. त्याचे बोलणे सार्थकच्या मनाला जाऊन भिडले. अपहरणामागचे कारण त्याला समजले होते.

“ये सौमित्र, तू मला फोनवर सांगितलेली माहिती ऐकून मी लगेचच तपासाला सुरुवात केली. सार्थकच्या शाळेसमोर एक दुकान आहे. तिथे चांगले बटाटे वडे मिळतात, त्यामुळे खुप गर्दी असते. सार्थक बेपत्ता होण्याच्या काही दिवस आधी एक माणूस येऊन त्याची चौकशी करून गेला. कदाचित त्याच माणसाने शाळेच्या शिपायाकडेदेखील चौकशी केली असावी. कारण दोघांनी केलेलं वर्णन सारखंच आहे. त्याप्रमाणे आम्ही त्या माणसाचे स्केच तयार केले आणि त्याचे रेकॉर्ड तपासले असता, तो एक किलर निघाला. पोलीस त्याच्या तपासावर आहेत. दुसरी गोष्ट सार्थकचा जवळचा मित्र रोहित याने खूपच महत्वाची माहिती दिली. रोहित बरोबर तो क्लास वरून निघत असता एका कारने त्यांना थांबवलं आणि एक पत्ता विचारला तो नेमका सार्थकच्या घराचा होता. त्या कार चालकाने दोघांनाही गाडीत घेतलं, रोहीतचं घर अलीकडे होतं त्यामुळे तो आधी उतरला. मला वाटतं त्याच गाडीने सार्थकला पळवलं असावं!” सौमित्रने मान डोलावली.

“त्या गाडीचा काही पत्ता मिळाला का? ”

“हो पुढच्या सिग्नलला कॅमेराने गाडी शूट केली आणि रोहितला त्या दरम्यानचं शुटींग दाखवलं. त्यामुळे त्याने ती गाडी ओळखली. ”

“ग्रेट जॉब किरण, तू खरंच खुप कमी वेळात बरीच माहिती मिळवली आहेस. ”

“इट्स माय जॉब. आपल्याला आता एका पत्त्यावर जायचे आहे. थोडी घाई करावी लागेल. कारण तू माझ्याकडे यायला खुप उशीर केला आहेस. मि. अभ्यंकरांच्या मोबाईल आणि घरचे रेकॉर्ड्स तपासले आहेत. त्यांना वेगवेगळया ठिकाणावरून फोन आले. त्यातले बरेचसे बूथ आहेत. पण एक कॉल मला थोडी शंका देणारा वाटला, ” किरण ओवरकोट अंगावर घालत म्हणाला.

“का? असं तुला का वाटलं? ”

“तो कालचा कॉल आहे. रात्री २. ४८ चा जे लोकेशन ट्रेस झालं आहे, ते लोणावळयामधलं आहे. एवढ्या लांब फक्त चकवा देण्यासाठी कोणी गेलं असेल अशी मला शंका वाटते आणि मि. अभ्यंकरांना २४ तासांची शेवटची मुदत दिली आहे. तेव्हा माझ गटफील सांगतय की, तिथे नक्कीच काहीतरी सापडेल. ”

“किरण, मी येऊ? ” किरणने दोन मिनिट विचार केला.

“चल”

सार्थकचे विचारचक्र विद्युत गतीने चालत होते. आता शरीराला होणाऱ्या वेदनांपेक्षा आपल्या आई-वडिलांना होत असलेल्या त्रासाचं त्याला जास्त वाटत होतं. खिडकीबाहेरच्या अंधुक प्रकाशावरून पहाट झाली असावी की तिन्हीसांज याचा त्याला अंदाज येईना. कुलदेवतेचं स्मरण करून तो उठला. दुखऱ्या भागांतून कळ मस्तकात गेली. ओठांवर दात रोवत त्याने ती सहन केली आणि लंगडतच तो

भिंतीला धरून दरवाजा चाचपडत होता. अखेर त्याला यश आले. दरवाज्यावर थापा मारल्यावर बाहेर कसलीतरी हालचाल झाली. दरवाजा उघडला गेला. दोन बोटे दखवून त्याने पोटाकडे हात नेला. कानडी सारख्या भाषेत पुटपुटत पहारेकऱ्याने संडासाचे दार उघडले. अधिकच लंगडत सार्थक आत शिरला आणि त्याने दरवाजा बंद केला. एरवी त्याचे हात बांधले जात परंतु आज नशीब जोरावर होते. कमोडवर चढून त्याने खिडकीवरची लाकडी फळी काढली. फट्ट, असा लहानसा आवाज झाला. तेवढ्याशा आवाजाने सार्थकचे हृदय गप्पकन बंद झाले. पोटात मोठ्ठा गोळा आला. बाहेर कोणाचीच चाहूल लागली नव्हती. त्यामुळे त्याने ती फळी तशीच हातात धरली. ५-१० सेकंद गेले असतील. आता फळी घेऊन परत खाली उतरण्याएवढा वेळ नव्हता. आयताकृती खिडकीतून बाहेरील बाजूस असलेल्या जमीनीच्या खोलीचा अंदाज लागत नव्हता. त्याने कमोडचा फ्लश दाबला. पाण्याच्या मोठ्या आवाजाच्या जोरावर जीव खाऊन खिडकीतून तो पलीकडे गेला. फळी लगेचच खाली पडली. म्हणजे खोली जास्त नव्हती. फ्लशचा आवाज कमी कमी होत होता. त्यातच त्याने खिडकीवरचे हात सोडले. धप्पSSSSSS असा लहानसा आवाज झाला. परंतु रातकिड्यांच्या किरकीरीत तो वातावरणात मिसळून गेला.

आता चांगलाच अंधार पडला होता. म्हणजे रात्रीचे साधारण ७- ७.१५ वाजले असावेत. सार्थक वाट फुटेल तसा सैरावैरा पळू लागला. कारण २-३ मिनिटांत त्या मारेकऱ्यांना तो गायब झाल्याचे समजणार होते. पाठलाग निश्चित होता. खुप धावल्यावर सार्थकच्या लक्षात आले की आपण पूर्णतः वाट चुकलेलो आहोत. अर्थात वाट माहित नसलेल्याला ती चुकण्याची चिंता नसते. फक्त दूरवर जंगलच दिसत होते. त्यामुळे सकाळ होईपर्यंत कुठेतरी सुरक्षित ठिकाणी थांबणे गरजेचे होते. अंधाराला डोळे सरावलेले असले, तरी पूर्णतः निर्मनुष्य आणि अज्ञात

स्थळी कुठे सुरक्षित जागा शोधायची हा प्रश्नच होता. त्यातच जंगली श्वापदांची भीती होतीच. एक मोठेसे झाड शोधून त्याने त्याच्यावर थांबायचा निर्णय घेतला. परंतु आजवर कधीही झाडावर चढला नसल्याने ३-४ प्रयत्नामध्ये त्याला ते जमेना. अखेर त्याने मन घट्ट केले आणि तसेच पुढे जायचे ठरवले. चालताना तो वातावरणाचा कानोसा घेत होता. पाय थकत होते, वाट संपत नव्हती. हळूहळू सार्थकच्या डोळयांपुढे अंधारी येऊ लागली. कुठेतरी थांबणे क्रमप्राप्त होते. अखेर त्याचे पाय थकले. एक पाऊल पुढे टाकणे शक्य होईना. जवळच एका मोठ्या दगडावर त्याने अंग टाकले. डोळे जड झाले होते. भोवतालचा अंधार गडद होत होता. इतक्यात दूरवर बॅटरीचा प्रकाशझोत दिसला आणि सार्थक सावध झाला. त्याच्या हृदयाचे ठोके वाढले. क्षणार्धात त्याच्या मेंदूने निर्णय घेतला. जवळच एक खड्डा होता त्यात थोडा पालापाचोळा आणि घाण होती. सार्थकने काही लहान झाडे मुळासकट ओढली आणि खड्ड्यात उडी मारली. हातातली छोटी झाडे त्याने डोक्यावर पांघरली. डोळे मिटून देवाचा धावा करत तो पडून राहीला.

खड्ड्यात ओलसर, कुबट वास येत होता. रानटी झाडाच्या पानांचाही उग्र वास येत होता. परंतु “जान बची लाखो पाये” या म्हणीनुसार जगणे हेच त्याच्या आयुष्याचे लक्ष झाले होते. सार्थकचा जीव त्याच्या कानांमध्ये उतरला होता. कसलाच आवाज येत नव्हता त्यामुळे शोधणारे कुठपर्यंत आले ते समजत नव्हते. खड्ड्यातल्या पानांमुळे आणि घाणीमुळे त्याच्या अंगाला खाज यायला लागली होती. अखेर त्याने खड्ड्यातून आपले डोके वर काढले आणि तीच त्याची घोडचूक ठरली. बॅटरीच्या प्रखर झोताने त्याचे डोळे दिपले.

आता सार्थकचे अवसान गळाले. आईSSSSSSS अशी ओरड मारून तो मोठ्याने रडू लागला. कोणीतरी दणकटपणे त्याच्या बखोट्याला धरून त्याला लीलया खड्ड्यातून बाहेर काढले आणि त्याच्या तोंडात बोळा घालून एका कापडाने त्याचे तोंड बांधले.

"सार्थक ओरडू नकोस, आम्ही तुला इथून नेण्यासाठी आलो आहोत. मी सौमित्र मला ओवीने इथे पाठवले आहे, " अगदी हळू आवाजात सौमित्र कुजबुजला आणि सार्थकला त्याच्या बोलण्याचा अर्थ खुप उशिरा समजला. तो सुमित्रला बिलगला आणि स्फुंदू लागला.

"इथे फार वेळ थांबणे धोकादायक आहे. आपल्याला लगेच निघावे लागेल, " किरणने सार्थकच्या तोंडावरची पट्टी काढली आणि ते तिघे मार्गक्रमण करू लागले. साधारण ५-१० मिनिटे चालले असतील आणि अचानक पिस्तुलातून गोळी सुटल्याचा आवाज आला आणि सार्थक घायाळ होऊन जमिनीवर पडला. क्षणार्धात ५-६ माणसांचे कडे त्या तिघांभोवती पडले.

"कसलीही हालचाल नका करू, नाहक पोराचा जीव जाईल, " एका काळयाकभिन्न गुंडाने हुकमी आवाजात सांगितले. अचानक सौमित्र हलला, काय झाले समजायच्या आर त्याच्या बुटांचा प्रहार समोरच्या दोघांच्या हनुवटीवर बसला. बाकीचे हालचाल करेपर्यंत किरणच्या पिस्तुलातून गोळया सुटल्या आणि दोघे घायाळ झाले. तेवढ्या वेळात एकाने सार्थकवर गोळी झाडली. सार्थक जीव खाऊन ओरडला. प्रत्युत्तरादाखल किरणच्या गोळीने मारेकऱ्याचा खांदा जखमी झाला.

रक्ताच्या थारोळयात पडलेल्या सार्थकला लवकर हॉस्पिटलमध्ये नेणे अत्यावश्यक होते. पहिली गोळी डाव्या हाताला घासून गेली होती. दुसरी मात्र उजव्या मांडीत घुसली होती. दोन्ही जखमा सौमित्रने घट्ट बांधल्या.

"माझ्या एका मित्राचे लोणावळयात हॉस्पिटल आहे. तिथे याला घेऊन जाऊ!" सुमित्र म्हणाला. त्याने सार्थकला उचलून घेतले आणि दोघे निघाले.

तासभर सार्थक ऑपरेशन थेटरमध्ये होता. आता तो पूर्णतः धोक्याच्या बाहेर होता. अपहरणकर्त्यांना आणि ब्लॅकमेलरना पोलिसांनी पकडले. ओवीच्या मामींची तब्येत लेकाला बघितल्यावरच सुधारली होती.

“सौमित्र आमच्यासाठी तू जीवनदान देणारा ठरलास. तुझे उपकार मी कसे मानू कळत नाही, ” मामांनी हात जोडत म्हटले. सर्वांचेच डोळे पाणावले होते. ओवी कोपऱ्यातून सौमित्रकडे पाहत होती. तिला वाटत होतं की धावत जाऊन त्याच्या मिठीत शिरावं, त्याला आपल्या मनातले प्रेम सांगावे, परंतु आत्ता ते शक्य नसल्याने ती केवळ बघत बसली होती. तिच्या सौमित्रला!

“मामा अहो हे माझं कर्तव्य आहे, ” असे म्हणत सौमित्रने अर्थपूर्ण कटाक्ष ओवीकडे टाकला आणि तिच्या गालावरची लाली बघून त्याला समाधान वाटले. एवढ्यात सौमित्रच्या फोनची रिंग वाजली.

“हा बोल साहिल. सार्थक आता एकदम बरा आहे. ”

“मित्र, राधिकाची प्रकृती खालावते आहे. डॉक्टरांनी आशा सोडली आहे. तुम्ही जमलं तर इकडे या. मी आता पूर्ण निराश झालो आहे, ” साहिल ओक्साबोक्शी रडायला लागला.

“आम्ही लगेच निघालोय, ” सौमित्रने फोन ठेवला.

“ओवी आपल्याला निघावं लागेल. राधिकाची प्रकृती खालावते आहे. मामा तुम्ही इकडेच थांबा. सार्थकला गरज आहे, ” ओवी आणि सौमित्र निघाले. संपूर्ण प्रवासात ओवी शांतपणे प्रार्थना करत होती. तिच्या सहवासात सौमित्रलाही ताजे तवाने वाटू लागले होते.

हॉस्पिटलमध्ये पोहोचल्यावर ओवी राधिकाला भेटण्यासाठी तिच्या खोलीमध्ये गेली. तर तेथे सर्वजण जमले होते. साहिल खुप रडत होता.

“सगळं चांगलं होईल साहिल, विश्वास ठेव, ” सौमित्रने धीर दिला.

“आता काही होणार नाही. सगळं संपल. राधिका आता आपल्यात नाही, ” साहिल म्हणाला आणि मोठ्याने रडू लागला. त्याचे ते शब्द लाव्ह्यासारखे ओवी आणि सौमित्रच्या कानात गेला. ओवी राधीकाजवळ गेली. तिने तिचा हात हातात घेतला. ती तिच्या कानाजवळ गेली आणि सांगू लागली,

“राधा, अगं असं काय करतेस? तुला साहिल किती आवडतो. आता तुमचं लग्न होणार आहे आणि तू झोपून राहिली आहेस? साहिलने हनिमूनचं प्लानिंग केलंय सिंगापूर, तुला जायचं होतं न तिकडे? सौमित्रने मला मागणी घातली आहे. दोघीही एकत्रच जाऊ. उठ न राधा! उठ नाSSSSSSSSS”ओवीने तिला हलवले. तिचे डोळे भरले होते. राधिकाच्या बोटांची खरंच हालचाल झाली की तो भास होता ते ओवीला समजेना. करंगळी हलली आणि ओवी ओरडली.

“मित्र अरे राधिकाकडे बघ. तिची करंगळी हलतेय, ” ताबडतोब डॉक्टर्सना बोलावण्यात आले. ई. सी. जी. वर हृदयाची स्पंदन सुरु झाली होती. राधिकाचा ऑक्सिजन पुन्हा सुरु केला गेला. सलाईन सुरु केली गेली. सौमित्र सर्वांना खोलीबाहेर घेऊन गेला.

थोड्या वेळाने डॉक्टर्स बाहेर आले. ते सौमित्रला म्हणाले, “मेडिकल प्रोफेशनमध्ये याला चमत्कारच म्हणतात. राधिका आता पूर्णतः शुद्धीवर आलेली आहे. फक्त थोडावेळ कोणी आत जाऊ नका. कोमामधून बाहेर आल्यावर एकदम नवीन वातावरण पाहून पेशंट घाबरून जाऊ शकतो. तिला आता सर्व व्यवस्थित आठवतंय का? याची परीक्षा घेतली जाईल मग तुम्ही तिला भेटू शकता.

सर्वांच्याच चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता. साहिलने ओवीला जवळ घेतले. त्याच्या डोळयामधून आनंदाश्रू वाहत होते, “ओवी अगं सख्या बहिणीपेक्षाही तू जास्त केले आहेस, ” त्याला पुढे बोलवेना. साहिलच्या वडिलांनी पेढ्यांनी सर्वांचे तोंड गोड केले.

चार महिन्यानंतर

ओवी-सौमित्र आणि राधिका-साहिल यांचे एकाच मांडवात धुमधडाक्यात लग्न पार पडले. ठरल्याप्रमाणे दोन्ही जोडपी सिंगापूरला फिरायला गेली. दुखा:चे मळभ संपले होते. चहुबाजूने आनंदाचा लख्ख प्रकाश पडला होता. सिंगापूरला सौमित्रच्या सहवासात विरघळलेल्या ओवीच्या मनात आलं,

“पुर्वाभासाने माझ आयुष्य बदललं, पण चांगल्या मार्गाने! आता मी समाधानी आहे. जे होतं ते चांगल्यासाठीच होतं. ”

# ई साहित्य प्रतिष्ठान

मराठी भाषा आता झेप घेण्याच्या मूड मध्ये आहे. रडणाऱ्यांकडे लक्ष नका देऊ. मराठीत कधीच नव्हते इतके वाचक आहेत आता. पुर्वी पुस्तकाच्या एका आवृत्तीच्या हजार दोनहजार प्रती छापल्या जात. पाच हजार म्हणजे डोक्यावरून पाणी.

आता ई पुस्तकांच्या जमान्यात एक एक पुस्तक पाच दहा लाख वाचकांपर्यंत जातं. वर्षाला अर्धाकोटी डाऊनलोड होतात. वाचक एकमेकांना परस्पर फ़ॉरवर्ड करतात. व्हट्स अप, ई मेल, ऍप्प, ब्ल्यु टुथ, वेबसाईट, पेन्ड्राईव्ह, सिडी अशा असंख्य मार्गांनी पुस्तकं व्हायरल व्हायलीत. सुसाट सुटलित. खेड्यापाड्यांच्या गल्लीबोळांपासून ते जगाच्या पाठिवरच्या प्रत्येक देशात. रॉकेटच्या वेगाने सुसाट सुटलेल्या मराठीच्या वेगाला आता कोणी थांबवू शकत नाही.

या धूमधडक क्रांतीत सामिल व्हा. आपल्या ओळखीच्या मराठी साक्षरांना यात ओढा. त्यांचे ई मेल पत्ते, व्हाट्सप नंबर आम्हाला पाठवा. तुम्ही फ़क्त दहा वाचक आणा. ते शंभर आणतील. आणि ते दहाहजार. तुमच्या व्हाट्सप ग्रुपमधून याची जाहिरात करा. आपल्याला फ़ुकट पुस्तकं वाचकांपर्यंत पोहोचवायची आहेत. आपल्याला टिव्ही पेपर ची जाहिरात परवडत नाही. आमचे वाचक हेच आमचे जाहिरात एजंट. तेच आमची ताकद. मराठी भाषेची ताकद जगाला दाखवू.

ई साहित्यची पुस्तके

www. esahity. com वरून डाऊनलोड करा.

esahity@gmail. com ला कळवून मेलने मिळवा. किंवा7710980841हा नंबर सेव्ह करून या नंबरला तुमचे नांव व गांवWhatsapp करून पुस्तके whatsapp मार्गे मिळवा.

किंवा ई साहित्यचे app. https://play. google. com/store/apps/details?id=com. esahity. www. esahitybooks या लिंकवर उपलब्ध आहे. तेdownload करा.

हे सर्व मोफ़त आहे.

